❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २३० ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

संध्या प्रहार




# निकालाचा फेरविचार व्हावा

## चंद्रचूड यांच्या घटनापीठाने दिलेल्या निकालावर बोट, ठाकरेंच्या वकिलांची मोठी मागणी

■ मुंबई (दै. संध्या)




शिवसेना पक्ष आणि चिन्हाच्या वादावर सुरू असलेल्या सुनावणीमध्ये मोठा ट्विस्ट आला आहे. या आधी माजी सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्या पाच न्यायालयाच्या घटनापीठाने शिवसेनेच्या बाबतीत जो निर्णय दिला आहे, त्याचा फेरविचार करावा अशी मोठी मागणी ठाकरेंचे वकील कपिल सिब्बल यांनी केली. घटनापीठाच्या त्या निर्णयामुळे निवडणूक आयोगाला अधिकार मिळाला आणि त्यांनी शिवसेना ही एकनाथ शिंदे यांना दिली. त्यामुळे त्या निर्णयावर सात न्यायाधीशांच्या घटनापीठाने फेरविचार करावा, असी मागणी कपिल सिब्बल यांनी सर्वोच्च न्यायालयात केली. शिवसेना पक्ष आणि चिन्हाची लढाई आता अंतिम टप्प्यात असून ठाकरेंचे वकील आणि ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी पाचव्या दिवशीही युक्तिवाद केला. ज्या निकालामुळे निवडणूक आयोगाला त्यांच्या अधिकारक्षेत्राबाहेरील अधिकार मिळाला त्या निकालाचा फेरविचार करण्यात यावा अशी मागणी त्यांनी केली. कपिल सिब्बल म्हणाले की, "निवडणूक आयोगाच्या संदर्भात या आधी पाच न्यायालयाच्या घटनापीठीने निर्णय दिला होता. त्याचा पुनर्विचार करण्यासाठी तो सात न्यायाधिशांच्या घटनापीठाकडे पाठवला जावा. या घटनापीठाने निर्णय देताना म्हटलं होतं की, एकाच वेळी दोन वेगवेगळ्या मुद्द्यावर सुनावणी होऊ शकते. आमदारांच्या अपात्रतेवर विधानसभा अध्यक्ष निर्णय घेऊ शकतात. त्याचवेळी पक्ष आणि चिन्हाची सुनावणी निवडणूक आयोग घेऊ शकते. मात्र विधानसभा अध्यक्षांच्या निर्णयात आमदार जर अपात्र ठरले तर त्याच्या आधारे म्हणजे, विधिमंडळ बहुमताच्या आधारे निवडणूक आयोग निर्णय घेणार असेल तर तो निर्णय काय होणार? म्हणजे हे दोन्ही निर्णय एकमेकांवर अवलंबून असताना त्याच्या वेगवेगळ्या सुनावण्या घेण्यासंबंधी घटनापीठीने निर्णय दिला. त्यामुळे या निर्णयाचा सात न्यायाधीशांच्या घटनापीठाने पुनर्विचार करावा." शिंदेंच्या गटाकडे आमदारांची संख्या मोठी असल्याने त्या आधारे निवडणूक आयोगाने निर्णय दिला. पक्षाचे चिन्ह कोणाला द्यायचे हे ठरवण्यासाठी विधिमंडळ शाखेतील बहुमत निर्णायक ठरते, असा आयोगाचा निष्कर्ष येतो.

विधान परिषदेमधील 12 आमदारांपैकी एकही आमदार शिंदेंकडे नव्हता, सर्व आमदार हे ठाकरेंच्या सोबत होते. लोकसभेतील 19 पैकी 13 खासदार शिंदेंसोबत गेले, तर ठाकरेंकडे सहा खासदार होते. राज्यसभेमध्ये शिंदेंसोबत कुणीही गेलं नाही, तर ठाकरेंकडे तीन खासदार होते. या सगळ्या आकडेवारीनुसार, ठाकरेंकडे 34 आमदार आणि खासदार होते. तर शिंदेंकडे ती संख्या 53 इतकी होती. परंतु त्यापैकी 39 आमदार हे अपात्रतेच्या कारवाईला सामोरे जात होते. त्या सगळ्यांना जर विधानसभा अध्यक्षांनी अपात्र ठरवलं असतं तर विधिमंडळातील बहुमत हे ठाकरेंकडे असतं, असा युक्तिवाद कपिल सिब्बल यांनी केला.



## पंजाबच्या माजी उपमुख्यमंत्र्यांवर नांदेडच्या गुरुद्वारात हल्ला

■ नांदेड (दै. संध्या)

पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री आणि शिरोमणी अकाली दलाचे प्रमुख सुखबीरसिंह बादल यांच्यावर नांदेड येथील गुरुद्वारा परिसरात प्राणघातक हल्ला झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. तख्त सचखंड श्री हजूर साहिब येथे कुटुंबासह दर्शन घेऊन बाहेर पडत असताना एका हल्लेखोराने त्यांच्यावर कृपाणने वार केला. या हल्ल्यात बादल यांच्या डाव्या हाताला दुखापत झाली असून त्यांना तातडीने नांदेड येथील यशोसाई रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती सध्या स्थिर आहे. हल्ल्यानंतर तिथे उपस्थित सुरक्षा रक्षकांनी आणि पोलिसांनी आरोपीला तात्काळ घटनास्थळावरूनच ताब्यात घेतले. त्याचं नाव जसपालसिंह (वय 62) असून तो मूळचा पुण्याचा राहणारा आहे. त्याने पुणे न्यायालयात वकील म्हणून काम केलेले आहे. जसपालसिंह हा गेल्या 2 वर्षांपासून नांदेडजवळील एका गुरुद्वारात सेवाभावी काम करत होता. सुखबीरसिंह बादल हे मातासाब गुरुद्वारातून बाहेर पडताच जसपालसिंगने कृपाण काढून त्यांच्यावर हल्ला चढवला. पोलीस सध्या त्याची कसून चौकशी करत आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेची गंभीर दखल घेतली असून नांदेडचे पोलीस अधीक्षक यांच्याकडून घटनेची संपूर्ण माहिती घेतली आहे. मुख्यमंत्र्यांनी सुखबीरसिंह बादल यांच्याशी फोनवरून संवाद साधून त्यांच्या आरोग्याची विचारपूस केली. या हल्ल्यामागे नेमका काय उद्देश होता आणि कोणती पार्श्वभूमी आहे, याचा सखोल तपास करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी पोलिसांना दिले आहेत. सुखबीरसिंह बादल यांच्यावर हल्ला होण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधी 4 डिसेंबर 2024 रोजी अमृतसर येथील ऐतिहासिक सुवर्णमंदिराच्या प्रवेशद्वारावर त्यांच्यावर गोळीबार करण्याचा प्रयत्न झाला होता. त्या वेळीही ते बालबाल वाचले होते. नांदेड हे शिख धर्मातील पाच तक्तांपैकी एक महत्त्वाचे धार्मिक स्थळ असून जिथे 10 वे गुरु गोविंद सिंग जी यांनी आपल्या आयुष्याचा अंतिम काळ घालवला होता. या घटनेनंतर सुखबीरसिंह बादल यांच्या सुरक्षेत मोठी वाढ करण्यात आली आहे.

## थोडक्यात...

### पथ विभागाच्या कामांची होणार पोलखोल?

पुणे : दैनिक संध्या

पुणे शहरात खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झालेले असताना महापौर मंजूषा नागपुरे यांनी पथ विभागाची झाडाझडती घेतली. दरवर्षी कोट्यवधी रुपये रस्त्यांवर खर्च होत असतानाही खड्डे का पडले आहेत?, कामांचा दर्जा निकृष्ट आहे का? दोष दायित्व कालावधीत कामे का करून घेतली जात नाहीत? असे प्रश्न उपस्थित केले. त्यावर प्रशासनाने खुलासा केला पण त्यावरून समाधान न झाल्याने पुढील आठ दिवसांत गेल्या वर्षभरातील कामांचा रस्त्यानुसार सविस्तर अहवाल देण्याचे आदेश महापौरांनी दिले आहेत. शहरातील खड्ड्यांमुळे पुणेकर हैराण झाले आहेत. त्या पार्श्वभूमीवर महापौर नागपुरे यांनी अधिकाऱ्यांची बैठक घेतली. आयुक्त नवल किशोर राम यांच्यासह पथ विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यासंदर्भात पत्रकार परिषदेत नागपुरे यांनी माहिती दिली. शहरातील रस्त्यांचा आढावा घेतला. त्यामध्ये गेल्यावर्षी २०२५-२६ मध्ये रस्ते दुरूस्ती, रिसर्फेसिंग, रिस्टेटमेंट, खड्डे बुजविणे यासह सायकल स्पर्धेसाठी खर्च केला आहे. पण अनेक ठिकाणी दोष दायित्व कालावधी संपण्यापूर्वीच रस्ते खराब झाले आहेत. डांबराचा वरचा थर निघून गेला आहे. तरीही दोष दायित्व कालावधीत ही कामे दुरुस्त केली जात नाहीत. जर असे असेल तर या कामासाठी किती खर्च केला, किती किलोमीटरचे कोणते रस्ते दुरूस्त केले, त्याचे जीओ टॅगिंग केले आहे का? याची रस्त्यानुसार सविस्तर माहिती पुढील आठ दिवसांत उपलब्ध करून द्या. यामध्ये निकृष्ट दर्जाचे काम झाले असेल तर संबंधित अधिकारी, ठेकेदारांवर कारवाई करावी, असे निर्देश आयुक्तांना दिले आहेत.

### मी आरएसएसचेही रक्षण करणार : राहुल गांधी

मुंबई : दैनिक संध्या

लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबाबत एक मोठं विधान केलं आहे. त्यामुळे राजकीय चर्चेला उधाण आले आहे. "ज्या दिवशी आरएसएसची अभिव्यक्ती दाबण्याचा प्रयत्न होईल, त्या दिवशी मी त्यांचे रक्षण करेन, कारण त्यांनाही अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे." असं राहुल गांधी म्हणाले आहेत. आमचा उद्देश कोणालाही रोखण्याचा नसून प्रत्येकाला 'फ्रीडम ऑफ एक्सप्रेशन' असले पाहिजे, असे राहुल गांधींनी स्पष्ट केले. या दरम्यान त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर त्यांनी जोरदार निशाणा साधला. राहुल गांधी पुढे म्हणाले, "विद्यार्थ्यांना आपली बाजू मांडायची होती, त्यामुळे जंतरमंतरवर आंदोलन झालं. विद्यार्थी अडचणीत आहेत आणि बोलू इच्छितात, परंतु सरकार म्हणते – नाही. आम्ही जंतर-मंतरवर व्यवस्था कायम ठेवू. तुम्ही तुमचे म्हणणे मांडू शकत नाही. आज एक महिला माझ्याकडे आली होती, तिच्या मुलीवर ४ वर्षांपूर्वी उत्तराखंडमध्ये बलात्कार करून हत्या करण्यात आली होती. ती रडत आहे, तिची व्यथा सांगू इच्छिते, पण यंत्रणा सांगते की माफ करा, आम्ही तुम्हाला बोलण्याची परवानगी देणार नाही, कारण यामुळे अस्वस्थता पसरू शकते." "आता सरकारला एक गोष्ट समजली आहे की, हा देश व्यक्त होण्यापासून थांबणार नाही. भारतातील काही लोक भ्याड असल्यासारखं वागत आहेत. ३००० वर्षे जुना भारत समजून घेण्याची गरज नसून आजचा भारत समजून घेणे गरजेचे आहे. ज्या दिवशी आरएसएसची अभिव्यक्ती देशातून बाहेर काढण्याचा प्रयत्न होईल, त्या दिवशी मी त्यांचे रक्षण करेन; कारण त्यांनाही अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे." अशा शब्दांत राहुल गांधींनी भावना व्यक्त केल्या.

## मांस-मच्छी खाणाऱ्याला घर नाकारणारा फ्लॅटमालक मराठी माणूसच

■ मुंबई (दै. संध्या)

**ताडदेव प्रकरणात मोठा ट्विस्ट**

मुंबईतील घाटकोपर, मुलुंड आणि कांदिवली यांसारख्या भागांत मराठी भाषिक आणि मांसाहारी नागरिकांना घरे नाकारल्यानंतर आता दक्षिण मुंबईतील ताडदेवमध्येही तशीच घटना समोर येत आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या इस्टेट एजंट भावेश कावरेचा एक व्हिडीओ आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. त्यामध्ये तो म्हणतोय की, तुम्ही मांसाहार करत असाल तर ताडदेवमध्ये तुम्हाला घर मिळणार नाही. तुम्ही शाकाहारी असाल तर तुम्हाला घर मिळेल. भावेश कावरेच्या व्हिडीओवरून आता संताप व्यक्त केला जात आहे. मात्र या प्रकरणाता आता सगळ्यात मोठा ट्विस्ट आला आहे. एजंट भावेश कावरेने संवाद साधला. यावेळी भावेशने सदर व्हिडीओबाबत महत्वाची माहिती दिली. सदर घर हे एका मराठी माणसाचेच तेही वारकऱ्याचे होते. त्यांची अशी इच्छा होती की, आमचे हे घर एका व्हेज खाणाऱ्याने विकत घ्यावे. सदर घर देखील मराठी व्यक्तीनेच खरेदी केले. हे घर सगळ्यात लवकर विकले गेले, अशी माहिती भावेश कावरेने सांगितले. ताडदेव, दक्षिण मुंबईतील एका आलिशान नव्या हाय-राईज इमारतीतील फ्लॅटच्या विक्रीवरून सध्या मोठा वाद निर्माण झाला आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका व्हिडीओमध्ये रिअल इस्टेट एजंटने या इमारतीत फक्त शाकाहारी व्यक्तींनाच फ्लॅट विकला जाईल आणि मांसाहारी व्यक्तींना फ्लॅट दिला जाणार नाही, असा दावा केल्याचे समोर आले. या दाव्यामुळे मुंबईसारख्या बहुसांस्कृतिक शहरात घर खरेदी करतानाही व्यक्तीच्या खानपानाच्या सवयींवर निर्बंध लादले जाऊ शकतात का, यावरून सोशल मीडियावर तीव्र चर्चा सुरू झाली. मुंबईत शाकाहारी-मांसाहारी या आधारावर घर देण्यास किंवा विकण्यास नकार देण्याचा मुद्दा यापूर्वीही चर्चेत आला आहे. मात्र आता एजंट भावेश कावरेने मांस-मच्छी खाणाऱ्याला घर नाकारणारा फ्लॅटमालक मराठी माणूसच होता, अशी माहिती बोलताना दिली.




## राष्ट्रपती यांच्या हस्ते संगीत नाटक अकादमी पुरस्कार प्रदान

*महाराष्ट्रातील दहा कलावंतांचा राष्ट्रीय गौरव; संगीत, नृत्य, नाट्य व लोककलेतील योगदानाचा सन्मान*

■ नवी दिल्ली (दै. संध्या)




भारतीय कला आणि सांस्कृतिक क्षेत्रात महाराष्ट्राची समृद्ध परंपरा अधोरेखित करणाऱ्या महाराष्ट्रातील दहा मान्यवर कलावंतांचा संगीत नाटक अकादमी पुरस्काराने राष्ट्रीय स्तरावर गौरव करण्यात आला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते वर्ष २०२४ आणि २०२५ चे संगीत नाटक अकादमी आज पुरस्कार प्रदान करण्यात आले. आज नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे आयोजित या दिमाखदार सोहळ्यास केंद्रीय संस्कृती व पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत, योजना, सांख्यिकी व कार्यक्रम कार्यान्वयन राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) तथा संस्कृती राज्यमंत्री राव इंद्रजीत सिंह, संस्कृती मंत्रालयाचे सचिव विवेक अग्रवाल आणि संगीत नाटक अकादमीच्या अध्यक्षा डॉ. संध्या पुरेचा यांची प्रमुख उपस्थिती होती. महाराष्ट्रातील कलावंतांनी हिंदुस्तानी शास्त्रीय गायन, अभंग गायन, अभिनय, पारंपरिक रंगभूमी, लोकनृत्य, नृत्य संशोधन, शहनाई वादन, दिग्दर्शन, नाट्यसंगीत आणि कथक अशा विविध कलाप्रकारांत केलेल्या प्रदीर्घ व उल्लेखनीय योगदानाची राष्ट्रीय पातळीवर दखल घेण्यात आली. वर्ष २०२४ च्या पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील सहा कलावंतांचा समावेश आहे. हिंदुस्तानी शास्त्रीय गायनासाठी अरुण कशाळकर, अभंग गायनासाठी आनंद भाटे, अभिनयासाठी अरुण नलावडे, पारंपरिक रंगभूमीसाठी मुकुंद मराठे, लोकनृत्यासाठी सुभाष नारायण नकाशे आणि नृत्य क्षेत्रातील संशोधनासाठी शुभदा वरदकर यांना संगीत नाटक अकादमी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. वर्ष २०२५ च्या पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील चार मान्यवर कलावंतांना गौरविण्यात आले. शहनाई वादनासाठी शैलेश भागवत, दिग्दर्शनासाठी प्रमोद डी. पवार, नाट्यसंगीत क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की आणि कथक नृत्यासाठी मनीषा साठे यांना हा प्रतिष्ठेचा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. रोख रक्कम, ताम्रपत्र आणि शाल असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. सन १९५२ पासून प्रदान करण्यात येणारे संगीत नाटक अकादमी पुरस्कार हे भारतीय संगीत, नृत्य, नाट्य आणि लोककलेच्या क्षेत्रातील प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय सन्मानांपैकी एक आहेत. कलाक्षेत्रातील प्रदीर्घ, उल्लेखनीय आणि गुणवत्तापूर्ण योगदानाची दखल घेत कलाकारांना या पुरस्काराने गौरविण्यात येते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पुरस्कार विजेत्या सर्व कलावंतांचे अभिनंदन करून भारतीय कला आणि सांस्कृतिक वारसा समृद्ध करण्यात कलाकारांचे योगदान अत्यंत मोलाचे असल्याचे सांगितले. कलाकारांच्या साधना व सर्जनशीलतेमुळे भारतीय संस्कृतीची समृद्ध परंपरा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचत असल्याचे त्यांनी नमूद केले.

# मंत्रीस्तरीय टास्क फोर्स स्थापन करण्यात येणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : ड्रोन क्षेत्रातील उद्योजकांच्या सूचना व अपेक्षा जाणून घेण्यासाठी बैठक

■ मुंबई (दै. संध्या)




राज्यातील ड्रोन उद्योगाच्या विकासासाठी धोरणाची प्रभावी अंमलबजावणी, उद्योजकांपर्यंत योजनांची माहिती पोहोचविणे आणि त्यांच्या अडचणींचे तातडीने निराकरण करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड.आशिष शेलार यांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्स स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

ड्रोन क्षेत्रातील उद्योजकांच्या सूचना व अपेक्षा जाणून घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक झाली. बैठकीस मंत्री ॲड.आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, पोलिस महासंचालक सदानंद दाते, प्रधान सचिव डॉ.पी. अन्बलगन, सचिव विरेंद्र सिंह यांच्यासह ड्रोन उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

राज्यातील विविध धोरणांमध्ये संशोधन व विकास, स्वदेशी घटक निर्मिती, चाचणी, पेटंट तसेच अनुदानाबाबत असलेल्या तरतुदी एकत्रित करून ड्रोन उद्योगासाठी 'पॉलिसी ऑफ पॉलिसीज' तयार करण्याची आवश्यकता असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. राज्याचे ड्रोन धोरण इतर राज्यांच्या तुलनेत सक्षम असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. ड्रोन क्षेत्रातील संशोधन व विकास आणि स्वदेशी घटक निर्मितीला विशेष प्रोत्साहन देण्यावर भर देताना विविध धोरणांमधील संशोधनासाठीच्या आर्थिक तरतुदी एकत्रितपणे उपलब्ध करून देण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. उद्योजकांना संशोधन, विकास आणि चाचणीसाठी उपलब्ध असलेल्या विविध योजनांचा एकत्रित लाभ मिळणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

राज्यात आधीपासून कार्यरत असलेल्या ड्रोन उद्योगाच्या परिसंस्थेला बळकटी देण्यास प्राधान्य देण्याचे निर्देश देत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, नवीन उद्योग आकर्षित करण्यासोबतच विद्यमान उद्योगांकडे दुर्लक्ष होता कामा नये. प्रयोगशाळा आणि चाचणी सुविधा उपलब्ध होईपर्यंत विद्यमान संस्थांना चाचणी खर्चासाठी आर्थिक सहाय्य देण्याची शक्यता तपासण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. छत्रपती संभाजीनगर येथील इंडस्ट्रियल सिटी परिसरात 'ड्रोन सिटी' विकसित करण्याच्या कामाला गती द्यावी. ड्रोन उद्योगासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून जमीन उपलब्ध करून देण्यासाठी पुढील दोन-तीन वर्षांसाठी विशेष प्रोत्साहन धोरणाचा विचार करण्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. ड्रोन उद्योगासाठी टेस्टिंग रेंज, पेटंट खर्चासाठी सहाय्य तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा एकत्रित लाभ उद्योजकांना मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. राज्याचे ड्रोन धोरण हे सर्वसमावेशक असून, धोरण जाहीर होण्यापूर्वीच या क्षेत्रात कार्यरत असलेल्या युवक आणि उद्योजकांचाही विचार करण्यात आला आहे. ड्रोन उद्योजकांनी यापूर्वी केलेल्या कामाचे योग्य मूल्यमापन करून त्यांना विद्यमान धोरणाच्या चौकटीत संधी देण्यात येईल, असे इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले. ड्रोन क्षेत्रातील स्वदेशीकरणाला मोठे प्रोत्साहन देण्याचे राज्याचे उद्दिष्ट असून यासाठी आवश्यक पाठबळ आणि सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येणार आहे. तसेच विविध विभागांच्या समन्वयातून मिशन आणि सीएसआरच्या माध्यमातून या क्षेत्राला चालना देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. ड्रोनच्या चाचणीसाठी आवश्यक टेस्टिंग आणि रेंज सुविधा सक्षम करण्याबरोबर संरक्षण क्षेत्रातील वाढत्या संधींचा लाभ घेण्यासाठी एरोस्पेस क्षेत्र आणि संबंधित यंत्रणा तातडीने मजबूत करण्यात येणार असल्याचेही मंत्री ॲड. शेलार यांनी सांगितले.



## हायमाऊंट राज्य अतिथीगृहाचे उद्घाटन

■ मुंबई (दै. संध्या)

मलबार हिल येथील पुनर्बांधणी करण्यात आलेल्या हायमाऊंट राज्य अतिथीगृहाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. राज्यातील अतिमहत्त्वाच्या व्यक्ती, परदेशी शिष्टमंडळे तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या निवासासाठी सुसज्ज अशा या अतिथीगृहामुळे राज्याच्या आदरातिथ्य व्यवस्थेला अधिक बळ मिळणार आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार विश्वजित कदम, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, राजशिष्टाचार, परकीय थेट गुंतवणूक, परदेशस्थ नागरिकांचे विषय आणि संपर्क विभागाचे सचिव तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी डॉ. राजेश गवांदे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य अभियंता प्रज्ञा वाळके यांच्यासह वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

# संपादकीय

# आश्रमशाळा - पोटात गोळा

**जपतलाई आश्रमशाळेत मुलींना सर्पदंश झाला, मेळघाटात विषबाधा झाली, चिखलदऱ्यात भूतबाधेची अफवा आहे. आता आश्रमशाळा, पोटात गोळा म्हणण्याची वेळ आली आहे.**

ऋषीमुनींच्या, समाजसेवकांच्या, आश्रम शिक्षणाच्या धर्तीवर राज्यात आश्रमशाळा सुरू झाल्या. डोंगराळ, दुर्गम, आदिवासी भागात जिथे शिक्षणाची सुविधा नाही, तेथील मुलांना शिक्षणाची गोडी लागावी, त्यांनी मूळ प्रवाहात यावं म्हणून प्रयत्न झाले. शाळांमध्ये काही शासकीय होत्या, तर काही अनुदानित. शासकीय शाळा सरकारी पद्धतीने, अनुदानित संस्थाचालकांच्या मर्जीने चालू लागल्या. मोठी अनुदाने, त्यातील वाटा, प्रत्येकाचा कोटा असे अभद्र व्यवहार घुसले. अर्थकारणाने वेग धरला तसे शिक्षण आणि सुविधा माघारल्या. जपतलाईत गेलेले तीन निरागस जीव व्यवस्थेच्या निष्काळजीची दंशकथा ठरली.

आदिवासी दिनाचा उत्सव साजरा करून आलेल्या मुली एका मोठ्या खोलीत, जमिनीवर झोपल्या होत्या. रात्री अडीचच्या दरम्यान एका मुलीला काही तरी चावल्याचं जाणवलं. तिचा आरडाओरडा सुरू झाला तोच दुसऱ्याही मुलीला सापाने दंश केला. तालुक्याचं ठिकाण धानोरा अवघ्या दहा किलोमीटरवर. रस्ता खराब असल्याने त्यांना २५ किलोमीटरचा वळसा घेऊन दवाखान्यात जावं लागलं. त्या तिथे पोहोचतात तोच, आश्रमशाळेत आणखी चार मुलींना सर्पदंश झाल्याचं निदर्शनास आलं. या सगळ्यात तिघींचे प्राण गेले. मुख्यमंत्र्यांनी तत्परता दाखवत एकीला हेलिकॉप्टरने नागपुरात दाखल केलं. व्यवस्थेला असुविधेचा सर्प कसा विळखा घालतो बघा, सगळ्या मुली एकाच खोलीत झोपत, त्यांना खाटा नव्हत्या. लागूनच दगड विटांचे ढीग नि सरपणाचा ढिगारा. तिथे तीन महिने आधी एक साप निघाला होता. आता दीडशेहून अधिक मुली शाळा सोडून निघाल्या. शिक्षणात रस निर्माण व्हावा म्हणून केलेली व्यवस्था जिवावर उठत असेल तर काय म्हणावे? संस्था काँग्रेसच्या नेत्याची असल्याने इतर पक्षांचे लोक टीका करतील. शासन कठोर उपाययोजना करील. त्याची अंमलबजावणी कोण आणि किती परिणामकारक करेल हा खरा प्रश्न. यापूर्वीच्या साळुंखे समितीच्या किती शिफारशी पूर्ण झाल्या? त्या झाल्या असत्या तर ही घटना घडली नसती. सर्पदंशापूर्वी मेळघाटातील विषबाधेचा प्रकार खूप गाजला. धारणीतील टिटंबा आश्रमशाळेतील मुलांनी जेवण केलं आणि कुणी गरगरलं, कुणाला चक्कर आली. जुलाब, उलट्या होऊ लागल्या. मुले घाबरून गेली. त्यांना तातडीने धारणीच्या रुग्णालयात दाखल केलं. यातून मुलं सावरत नाही तोच, बिजुधावडी, सावलीखेडा, सुसर्दा या आश्रमशाळेतील मुलांनाही तसंच होऊ लागलं. जवळपास १७० विद्यार्थी या अवस्थेतून गेले. विद्यार्थ्यांना सकस, गुणवत्तापूर्ण अन्न मिळावं म्हणून काही दिवसांपूर्वी आश्रमशाळेतील स्वयंपाक बंद करून 'सेंट्रल किचन'मधून अन्नपुरवठा सुरू केला. त्याच सेंट्रल किचनमधून विषाक्त अन्न बाहेर आलं. आजारापेक्षा उपचार भयंकर म्हणण्याची वेळ आली.

चिखलदरा तालुक्यातील डोमा आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांमध्ये अचानक भीतीदायक लक्षणं दिसू लागली. कारण नसताना मोठ्याने रडणं, जोरजोरात हसणं, अचानक ओरडणं, शांत बसून राहणं, कोणत्याही गोष्टीला प्रतिसाद न देणं आदी. मुले अचानक अशी वागू लागल्याने भुताटकीच्या अफवा पिकल्या. भूमकाला (मांत्रिक) पाचारण झालं. घाबरलेल्या पालकांनी मुलांना घरी परत नेले. डॉक्टरांच्या मते, 'हा 'मास हिस्टेरीया'चा प्रकार आहे. तीव्र मानसिक तणावातून तो होतो'. शाळेतल्या निरागस मुलांना असा कोणता तीव्र तणाव आहे. तो कोण देत आहे?

अशोक उईके यांनी आदिवासी विकासमंत्री झाल्यावर आश्रमशाळेत मुक्काम करून 'संवाद चिमुकल्यांशी' हा उपक्रम राबविला होता. मंत्र्यांनी नाही, अधिकाऱ्यांनी भेटी दिल्या, सुविधांची पाहणी केली तरी वचक राहील. छोटे-मोठे प्रकार थांबतील. मुलांना शिकण्यापेक्षा जगण्याची परीक्षा मोठी वाटू लागली, विद्येची दारे, भीतीची महाद्वारे बनू लागली तर शिक्षणाचा हेतू पराभूत होईल.

## संस्कृत सुभाषित

बीज तेचि फळे येईल शेवटी । लाभ हानी तुही ज्याची तया।।
अर्थ : जे पेराल तेच उगवते आणि लाभ व हानी ही ज्याची त्याची वेगवेगळी असते, म्हणून सत्कर्म करा. सद्विचाराने चाला.

## गुरु वचन

### प्रेम स्वातंत्र्याची किंमत नव्हे! : ओशो

आम्हाला सर्व हवे आहे पण आम्हाला प्रेम स्वातंत्र्याच्या किमतीवर नकोय. आपल्याला दोन्ही कसे मिळू शकते? मला माझे स्वातंत्र्य हवे आहे. मी माझ्या प्रेयसीला स्वातंत्र्य देतो पण मला तिचे लक्ष ठेवण्याच्या रुपात दु:ख मिळते. प्रेयसीला स्वातंत्र्य देण्याचा तुमचा विचारच चुकीचा आहे. प्रेयसीला स्वातंत्र्य देणारे तुम्ही कोण आहात? तुम्ही प्रेम करू शकतात व तुमच्या प्रेमात स्वातंत्र्य आहे. ही गोष्ट दुसऱ्याला देण्यासारखी नाही. जर देण्यास आली तर तिच अडचण येईल जिचा तुम्ही सामना करत आहात.

खरंतर तुम्ही स्वातंत्र्य देऊ इच्छित नाही. तुम्हाला वाटेल की, स्वातंत्र्य देण्यासारखी परिस्थितीच निर्माण होऊ नये पण तुम्ही अनेकदा मला प्रेम स्वातंत्र्य देते, हे सांगताना ऐकले असेल म्हणून स्वातंत्र्य देण्यासाठी स्वत:वर दबाव टाकतात कारण तुमचे प्रेम, प्रेम नसते.

तुम्हाला एका अवघड प्रश्नात अडकले आहात. जर तुम्ही स्वातंत्र्य दिले नसते तर तुम्हाला प्रेमावर संशय आला असता. जर तुम्ही इच्छा नसूनही स्वातंत्र्य दिले तर हजार प्रश्न निर्माण होतात. तुम्ही तुमच्या प्रेयसीसाठी पुरेसे नाहीत? की तिला दुसऱ्याची साथ हवी म्हणून तिला स्वातंत्र्य हवे आहे? यामुळे दु:ख होते व तुम्ही विचार करतात की, तुम्ही आपल्यापेक्षा कमी महत्व देतात.

तिला स्वातंत्र्य देऊन तुम्ही इतरास पहिले ठेवले व नंतर स्वत:ला. हे अंहकाराविरुद्ध आहे व यामुळे काही फायदा होणार नाही कारण तुम्ही जे स्वातंत्र्य दिले आहे त्यासाठी तुम्ही बदलणार.

दुसरी गोष्ट म्हणजे जर तुमची प्रेयसी दुसऱ्यासोबत राहिली असेल तर तुम्हाला आपल्या प्रेयसीसोबत राहणे वेगळे वाटेल. यामुळे तुमच्या व तिच्यात अडथळा निर्माण होईल. तिने दुसऱ्याची निवड केली आहे व तुम्हाला सोडून दिले आहे किंवा तिने तुमचा अपमान केला आहे.

व तुम्ही तिला खुप काही दिले आहे, तुम्ही उदार होत आहोत, तुम्ही तिला स्वातंत्र्य दिले आहे. तुम्हाला दुखावल्यासारखे जाणवत आहे म्हणून तुम्ही तिला कुठल्यातरी रुपात दुखवाल.

पण हे सर्व गैरसमजामुळे होते. मी हे म्हणालो नाही की, तुम्ही प्रेम करत असाल तर तुम्हाला स्वातंत्र्य द्यावे लागेल. नाही मी म्हणालो आहे की, प्रेम स्वातंत्र्य आहे. येथे प्रश्न देण्याचा नाही. जे जसे आहे त्याला तसेच राहू द्या. विनाकारण गुंतागूंत का वाढवायची? अगोदरच अनेक अडचणी आहेत.

जर तुमचे प्रेम त्या पातळीपर्यंत आले आहे की, स्वातंत्र्य तिचे अंग बनले आहे तेव्हा तुमच्या प्रेयसीला परवानगी घेण्याची गरजच राहणार नाही. जर मी तुमच्या जागी असतो व माझ्या प्रेयसीने परवागनी मागितली तर मला दु:ख झाले असते. याचा अर्थ तिला म झ्या प्रेमावर विश्वास नाही. माझे प्रेम स्वातंत्र्य आहे. मी तिच्यावर प्रेम केले आहे याचा अर्थ असा नव्हे की, मी सर्व मुभा दिली ज्यामुळे ती कुणासोबतही हसू शकेल, कुणासोबतही नृत्य करु शकेल, कुणावर प्रेम करु शकणार नाही कारण आपण कोण आहोत?

आपण कोण आहोत? हा मुळ प्रश्न आहे, जो सर्वांनी केला पाहिजे. आपण सर्व अनोळखी आहोत व या आधारावर आपण सांगू शकतो की, मी तुला स्वातंत्र्य देईल किंवा मी तुला स्वातंत्र्य देणार नाही. जर तु माझ्यावर प्रेम करत असेल तर दुसऱ्यावर प्रेम करू शकत नाही? या सर्व मूर्ख गोष्टी आहे पण या सर्व मानवावर सुरुवातीपासून हावी राहिल्या आहेत व आपण अजूनही असभ्य आहोत. प्रेम काय असते? हे आपणास अजूनही माहित नाही.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | करण:बालव ०७:४०:१५ |
| १४ ऑगस्ट २०२६ | करण:कौलव १८:४७:०७ |
| शुक्रवार | करण:तैतिल |
| विक्रम संवत्- २०८२ | ३०:०३:११+ |
| श्रावण शके | सूर्य:कर्क |
| संवत्- १९४८ | चन्द्र:सिंह |
| संवत्सर -पराभवनाम | हिजरी सन् - १४४८ |
| अयन- दक्षिणयन | मुस्लिम मास - सफर |
| मास- श्रावण | तारीख - ३० |
| ऋतु- सौर वर्षा | विशेष |
| शुक्ल पक्ष | चंद्रदर्शन |
| तिथि:द्वितीया १८:४७:०७ | जरा - जिवंतिका पूजन |
| नक्षत्र:पूर्वाफाल्गुनी | महालक्ष्मी स्थापना पूजन |
| २७:४२:२३+ | पत्तेती |
| योग:परिध ०९:२८:०२ | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०४०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | | | | 4 | | | 9 | 8 |
| 7 | | 9 | | | | 5 | | 6 |
| 8 | | 3 | | | 7 | 2 | | |
| 9 | | 5 | | 3 | | | | |
| 3 | 8 | | 1 | | 6 | | 5 | 2 |
| | | | | 7 | | 9 | | 3 |
| | | 8 | 3 | | | 1 | | 7 |
| 1 | | 2 | | | | 8 | | 5 |
| 4 | 7 | | | 8 | | | | 9 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १०३९ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 8 | 2 | 4 | 6 | 5 | 1 | 7 | 9 |
| 9 | 6 | 4 | 2 | 7 | 1 | 8 | 5 | 3 |
| 5 | 7 | 1 | 8 | 3 | 9 | 4 | 6 | 2 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 2 | 3 | 9 | 1 |
| 8 | 3 | 9 | 5 | 1 | 4 | 7 | 2 | 6 |
| 1 | 2 | 7 | 3 | 9 | 6 | 5 | 4 | 8 |
| 6 | 4 | 3 | 9 | 5 | 8 | 2 | 1 | 7 |
| 2 | 1 | 8 | 6 | 4 | 7 | 9 | 3 | 5 |
| 7 | 9 | 5 | 1 | 2 | 3 | 6 | 8 | 4 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १०४० – मॅकबेथने स्कॉटलंडचा राजा डंकन पहिल्याची हत्या केली. शेक्सपियरने लिहिलेल्या मॅकबेथ नाटकातील प्रमुख पात्र यावर आधारित आहे.
- १८४० – दुसरे सेमिनोल युद्ध – अमेरिकेतील सेमिनोल जमातीचा पराभव व फ्लोरिडातून ओक्लाहोमा येथे सक्तीचे स्थलांतर.
- १८४८ – ओरेगॉनला अमेरिकेचा प्रांत म्हणून मान्यता.
- १९१२ – अमेरिकेच्या सैन्याने निकाराग्वावर आक्रमण केले.

### राष्ट्रीय

- १६७८ – शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या बळकटीसाठी खांदेरीचा किल्ला बांधून घेतला.
- १९४७ – भारताच्या घटनासमितीच्या महत्त्वपूर्ण अधिवेशनाला रात्री ११ वाजता सुरुवात झाली.

### जन्म

- १२९७ – हानाझोनो, जपानी सम्राट.
- १६८८ – फ्रेडरिक विल्यम पहिला, रशियाचा राजा.
- १७४० – पोप पायस सातवा.
- १७७१ – सर वॉल्टर स्कॉट, ईंग्लिश ऐतिहासिक कादंबरीकार.
- १७७७ – फ्रांसिस पहिला, सिसिलीचा राजा.
- १८७६ – अलेक्सांदर ओब्रेनोविच, सर्बियाचा राजा.

### निधन

- ५८२ – तिबेरियस दुसरा कॉन्स्टन्टाईन, बायझेन्टाईन सम्राट.
- १४३३ – होआव पहिला, पोर्तुगालचा राजा.
- १४६४ – पोप पायस दुसरा.
- १९३८ – ह्यु ट्रम्बल, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
- १९५८ – ज्योल्यो फ्रेड्रिक, फ्रान्समधील एक थोर पदार्थविज्ञान शास्त्रज्ञ.

## : SMS :

Doctor sahab, bhoolne ki bimaari ho gayi hai
Doctor: Kab se hai?
Patient: Kaunsi bimaari?

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २८.४ | २३.५ |
| अहमदनगर | २९.१ | २२.८ |
| अकोला | २७.२ | २४.८ |
| अमरावती | २६.८ | २४.५ |
| बीड | ३७.५ | २६.६ |
| भंडारा | ३५.१ | २६ |
| बुलढाणा | ४४.६ | २७.६ |
| चंद्रपूर | ३७.८ | २७.१ |
| चेन्नई | ४१.४ | ३०.७ |
| नवी दिल्ली | ४५.६ | ३३.३ |
| धुळे | ३०.८ | २६ |
| गोंदिया | ३४.८ | २५.८ |
| जळगाव | २६.७ | २४.२ |
| कोल्हापूर | २७.२ | २३ |
| लातूर | ३०.८ | २३.९ |
| मुंबई | ३४.३ | ३०.२ |
| नागपूर | ३४.६ | २६.१ |
| नांदेड | ३२.६ | २५.६ |
| नंदूरबार | २५.७ | २४.५ |
| नाशिक | २६.८ | २३.६ |
| पुणे | २५.२ | २२.३ |
| पंढरपूर | ३४.२ | २४.४ |
| सातारा | २९.३ | २३.१ |
| सांगली | ३१ | २३.४ |
| सोलापूर | ३४ | २४.७ |
| वर्धा | ३४.९ | २५.५ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : उत्तर कौटुंबिक उत्साह, गोड वार्तालाप व आनंदाच्या गाठीभेटी यातून उत्साह संचरेल.

**तुळ :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : दक्षिण बोलण्यातील कटुता अहंकाररहित शब्दांनी टाळण्याचा प्रयत्न करा.

**वृषभ :** शुभ रंग: नीळा, अनुकूल दिशा : पश्चिम स्वत:ची तब्येत योग्य साथ देत असेल तर काही नवे संकल्प करणे हितकारक ठरेल.

**वृश्चिक :** शुभ रंग: गुलाबी, अनुकूल दिशा : दक्षिण वैवाहिक साथीदाराचा अगदी पत्नीचाही सल्ला अजिबात विसरू नका.

**मिथुन :** शुभ रंग: काळा, अनुकूल दिशा : पश्चिम व्यावसायिक प्रश्नामध्ये यश मिळेल. कोणाशीही वादविवाद वाढविणे नुकसानकारक ठरेल.

**धनु :** शुभ रंग: लाल, अनुकूल दिशा : उत्तर ताणतणावामुळे आजारपण उद्भवणार नाही याची काळजी घेणे.

**कर्क :** शुभ रंग : जांभळा, अनुकूल दिशा : पश्चिम खाण्यापिण्याची बंधने विसरू नका. कामकाजासंबंधी आपला शब्द प्रमाण मानला जाईल.

**मकर :** शुभ रंग: पिवळा, अनुकूल दिशा : पश्चिम वेळ देणे अत्यंत हितकारक ठरेल. ठरविलेले कार्यक्रम वेळेत पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध रहा.


**सिंह :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम शेजाऱ्याशी संबंध सलोख्याचे होतील. नुसते गप्पाष्टकांत अडकणाऱ्या मैत्रिणीपासून सावध रहा.

**कुंभ :** शुभ रंग: काळा, अनुकूल दिशा : दक्षिण आपले हिशेब चोख ठेवावेत. संशयाला कोठेही जागा राहणार नाही असे बोलणे व कृती ठेवावी.

**कन्या :** शुभ रंग: केसरी, अनुकूल दिशा : उत्तर खेळात प्राविण्य मिळेल. लहान लहान कोर्सेस आपले व्यक्तिमत्व फुलविणारे ठरतील.

**मीन :** शुभ रंग: केसरी, अनुकूल दिशा : दक्षिण काही सूचक स्वप्ने भविष्याचा कानोसा देणारी ठरतील. परदेश प्रवासाचे स्वप्न पुरे होईल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०४०



### आडवे शब्द

१. बिकट
६. आजपर्यंत
१०. डाळीचे कालवण
११. टप्प्या टप्प्याने केलेला प्रवास
१५. दोन्ही हातांच्या बोटांची संख्या
१६. धातूची तार काढणारा
१७. अडत्या
१९. वस्त्र, कापड
२२. संताप, चीड
२५. एक ज्वालाग्राही पदार्थ
२६. तत्काळ चपखल उत्तर देणारा
२७. सरसरीत
२९. काळ्या तोंडाचे मोठे माकड
३०. वारा, वायू, हवा
३१. सारखा, तुल्य
३२. भारतीय सैनिक
३३. घोड्याला बांधण्याची जागा
३४. फट, खड्डा
३६. तोफगाडी
३७. वाईट सवयी असलेला
३८. बालीशपणा
४१. आई
४२. गरीब
४३. वाळवंट
४५. एक शेंगभाजी
४७. गुलबक्षी रंगाचा हिच्याशी काय संबंध?
४८. सोन्या चांदीचा व्यापारी
४९. शिव्याशाप
५०. श्रीमान, श्रीयुत
५२. चुरूचुरू
५३. चक्र
५५. आटोपणे, साफसफाई करणे
५७. उलटी, ओकारी
६०. वितरण
६२. केसांची बट
६३. धमनी, ६४. कायदेशीर
६६. लत्ताप्रहार, ६७. छळ
६८. अहंकार
६९. पाणकोंबडा
७१. आठवण
७२. गुणाकार
७३. मध्यम प्रमाण
७४. फुलांचा वाफा
७५. वृत्तपत्र
७७. कुंपण
७८. जम
७९. चक्षु, डोळे
८०. देवाला घातले जाणारे 'संकट'

### उभे शब्द

१. इंद्रिय
२. आशीर्वाद
३. मोठा हातोडा
४. संध्याकाळ
५. पोट
६. सगळ्यात महत्त्वाचा दिवस
७. त्वरित
८. बेसावध
९. मनाची घालमेल, तडफड
११. राजाचे संबोधन
१२. वेल
१३. दागदागिने
१४. चामखीळ
१८. मिंधा
२०. सोशिकपणा
२१. दृष्टी, टक
२३. गाठोडे
२४. सुस्ती, कंटाळा
२५. राजमहाल
२८. युद्ध
३०. लिहिलेले वाचणारा
३२. इतरांपेक्षा निराळा
३३. अत्यंत तहान लागणे
३४. लोणच्यातील द्रव
३५. चिक्कू मनुष्य
३७. लग्न न झालेली
३८. मूल
३९. शेंगेवरील आवरण
४०. चंद्राची कड
४४. कपाळभर लावलेले कुंकू
४६. मार्गक्रमण
४७. मीठ
४९. समशेर
५१. मुसलमान
५४. बडबड, त्रास
५६. गुरांना गावाबाहेर कुरणात चरण्याबद्दल द्यावे लागणारे द्रव्य
५८. माज
५९. सुदैवी
६१. पळून जाणे
६४. संपूर्ण
६५. दात
६७. संथ गतीने चालणारा प्राणी
६८. 'श्रीमंत'च्या विरुद्ध
७०. गीत, गाणे
७१. सारखा
७२. छापील निवेदन
७४. आलाप, लकेर
७६. अर्धी ओंजळ

### जम्बो शब्दकोडे क्र. १०३९ चे उत्तर

आडवे उत्तर
१.व्यवसाय ५.पदरमोड ९.पाडवा ११.दामोदर १४.दरसाल १६.साहस १८.कारण १९.बालक २०.धवल २२.मातकट २४.वरवर २५.मन २६.वन २८.टणक २९.अवदसा ३०.कटी ३१.सुधा ३४.सामना ३५.नमस्कार ३६.माड ३७.रचनाकार ३८.वय ४०.नसता ४२.मोर ४४.दमामा ४६.सरदार ४८.खल ४९.नंदलाल ५०.कस ५२.रणगाडा ५४.पार्वती ५५.लकवा ५७.महामानव ५९.खोड ६०.विना ६२.कोठार ६५.सव्वाशेर ६६.नाचा ६७.रया ६९.मधुकर ७०.हमाल ७१.तातडी ७३.सीता ७४.कुडी ७६.नारद ७८.राजकारण ८०.जाणता राजा ८१.भू ८२.मलम ८३.रसबाळी

उभे उत्तर : २.वसाहत ३.यदा ४.पदरव ६.दरबार ७.मोदक ८.डर ९.पालव १०.वाचा १२.मोका १३.रणरण १५.साधनसामग्री १६.सामानसुमान १७.सकट २१.लवकर २३.टणत्कार २५.मदन २७.नटी २९.अनावर ३२.धाडस ३३.विनाकारण ३४.सार ३९.सीमा ४१.तास ४२.मोल ४३.विनंती विशेष ४४.दलाल ४५.मालक ४७.दारवठा ४८.खडा ५०.कम तरता ५१.सहा ५३.गाज ५४.पाडस ५६.वाटचाल ५८.नकोसा ६१.नार ६३.रमताराम ६४.नकलाकार ६६.नामानिराळा ६८.यातना ७२.डीर ७४.कुणबा ७५.सणक ७७.दम ७९.रस

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



### खडकवासला धरणाची साठवण क्षमता पूर्ववत करा

**पुणे : दैनिक संध्या**

पुणे शहर आणि लगतच्या परिसराच्या पाणीपुरवठ्याचा प्रमुख आधार असलेल्या खडकवासला धरणाची घटलेली साठवण क्षमता हा गंभीर आणि दीर्घकालीन प्रश्न आहे. धरणाची साठवण क्षमता पुनर्संचयित करण्यासाठी केंद्र सरकारने संबंधित यंत्रणांशी समन्वय साधून तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी केली. राज्यसभेतील विशेष उल्लेखाद्वारे त्यांनी या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधले. खडकवासला धरणाची मूळ साठवण क्षमता सुमारे ३.७५ टीएमसी होती. मात्र, गेल्या अनेक दशकांपासून साचलेल्या गाळामुळे धरणाची प्रभावी साठवण क्षमता निम्म्यापेक्षा अधिक घटली असून, ती सध्या जवळपास १.७५ टीएमसी इतकी राहिल्याचे डॉ. कुलकर्णी यांनी नमूद केले. साठवण क्षमतेत झालेल्या या मोठ्या घटीमुळे पावसाळ्यात उपलब्ध होणारे पाणी साठवून ठेवण्याची तसेच पावसाळ्यानंतर वाढती शहरी पाण्याची गरज भागविण्याची धरणाची क्षमता कमी झाली आहे. पुणे हे वेगाने विस्तारत असलेले महानगर असून, पिण्याचे पाणी, उद्योग, सार्वजनिक सेवा आणि पर्यावरणीय गरजांसाठी भविष्यात पाण्याची मागणी आणखी वाढणार आहे. विशेषतः अपुऱ्या पावसाच्या वर्षांत घटलेली जलसाठवण क्षमता जलव्यवस्थापन यंत्रणेवर मोठा दबाव निर्माण करू शकते. त्यामुळे पुण्याच्या दीर्घकालीन जलसुरक्षेसह सध्याच्या जलसाठवण आणि वितरण व्यवस्थेच्या क्षमतेचा गांभीर्याने विचार करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. खडकवासला जलाशयाची साठवण क्षमता वाढविण्यासाठी शास्त्रीय पद्धतीने गाळ काढणे, पाणलोट क्षेत्रात उपचारात्मक कामे करणे, गाळ व्यवस्थापन, जलाशयाचे आधुनिकीकरण आणि प्रभावी जल अंदाजपत्रक तयार करणे यांसारख्या उपाययोजनांचा संबंधित यंत्रणांच्या समन्वयाने अभ्यास करावा, अशी मागणी डॉ. कुलकर्णी यांनी केली. खडकवासला जलाशय प्रणालीचे सर्वंकष मूल्यमापन करून तिची भविष्यातील शाश्वतता निश्चित करणे आवश्यक आहे. पुणे शहरातील लाखो नागरिकांची जलसुरक्षा, शहरी विकास, सार्वजनिक आरोग्य आणि आर्थिक विकास यांच्याशी हा प्रश्न थेट संबंधित आहे. त्यामुळे आजच योग्य उपाययोजना केल्यास भविष्यात उद्भवणारे मोठे जलसंकट टाळता येईल, असेही डॉ. कुलकर्णी यांनी विशेष उल्लेखात स्पष्ट केले.




### अश्वारूढ तिरंगा यात्रा संचलनातून क्रांतिकारकांना अभिवादन

**पुणे : दैनिक संध्या**

भारत माता की जय... वंदे मातरम... च्या घोषणा, अश्वावर स्वार होऊन हाती तिरंगा ध्वज घेत भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारकांच्या त्याग, शौर्य आणि राष्ट्रभक्तीच्या स्मृतींना अश्वारोहकांनी अभिवादन केले. दिग्विजय प्रतिष्ठान हॉर्स रायडिंग अकॅडमी तर्फे क्रांतिदिनानिमित्त पुण्यात प्रथमच अश्वारूढ तिरंगा यात्रा संचलन आयोजित करण्यात आले होते. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे दर्शन घेऊन मंदिरापासून या अश्वारूढ संचलनाला प्रारंभ झाला. यावेळी परिमंडळ १ चे पोलीस उपायुक्त कृषिकेश रावले यांनी अश्वावर स्वार होत हाती तिरंगा ध्वज घेत यात्रेत सहभाग घेतला. यावेळी अकॅडमीचे अध्यक्ष गुणेश पुरंदरे, विनायक हळबे, नरेंद्र पाटील, जनक टेकाळे, समीर धर्माधिकारी यांसह पुणेकर मोठ्या संख्येने उपस्थित होते. वैभव कवडे, शशिकांत थोरात, साइदीप ढोबळेपाटील, आशिष जाधव यांनी नियोजन व सहकार्य केले. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे दर्शन घेऊन यात्रेला प्रारंभ झाला. बेलबाग चौक, लक्ष्मी रस्ता मार्गे ही यात्रा मार्गस्थ झाली. तर, टिळक चौक, लकडी पूल मार्गे छत्रपती संभाजी महाराज स्मारक येथे यात्रेचा समारोप झाला. विश्रामबाग विभाग पुणे शहर सहाय्यक पोलीस आयुक्त अनुजा देशमाने, पोलीस निरीक्षक (गुन्हे) विकास भिंगारदिवे यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराज स्मारकास पुष्प वाहून राष्ट्रगीता नंतर समारोप झाला. आठ वर्षापासून ते साठ वर्षांपर्यंतचे अश्वारोहण करणारे १५ प्रशिक्षित घोडेस्वार या अश्व संचलनामध्ये सहभागी झाले होते. गुणेश पुरंदरे म्हणाले, क्रांतिदिन आणि स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने ही अनोखी अश्वारूढ तिरंगा यात्रा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये अश्वारोहण करणारे विद्यार्थी विद्यार्थिनी यांसह पुणेकर नागरिक देखील हाती तिरंगा ध्वज घेऊन चालत मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. तर, अश्वावर स्वार होऊन हातात तिरंगा ध्वज घेत अनोख्या पद्धतीने क्रान्तिकारकांना देखील अभिवादन करण्यात आले. ठिकठिकाणी यात्रेचे स्वागत करण्यात आले. दिग्विजय प्रतिष्ठान हॉर्स रायडिंग अकॅडमी मागील पंचवीस वर्षांपासून अश्वारोहण प्रशिक्षण, अश्वारोहण मोहिमा, अश्वारोहण स्पर्धा इत्यादी माध्यमातून या पारंपरिक व आधुनिक ऑलम्पिक क्रीडा प्रकार सर्वसामान्य पर्यंत पोहोचवण्याचे कार्य करीत आहे. नुकतीच मे महिन्यामध्ये आपण २५ किल्ल्यांवरून शिवचरित्र प्रसार ही अश्व मोहीम यशस्वीरित्या पूर्ण केली. स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. क्रांतिदिनी हा अनोखा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

### सोनी मराठी वाहिनीवरील 'कोण होणार करोडपती'चे सूत्रसंचालन करणार माधुरी दीक्षित

**पुणे : दैनिक संध्या**

मराठी मनोरंजनविश्वात एका नव्या पर्वाची सुरुवात होत आहे. सोनी मराठी वाहिनी आणि



Sony LIV प्रेक्षकांचा ज्ञानावर आधारित लोकप्रिय कार्यक्रम 'कोण होणार करोडपती'च्या नव्या पर्वाची घोषणा करत असून या पर्वातून महाराष्ट्राची लाडकी लेक आणि पद्मश्री पुरस्कारानं सन्मानित अभिनेत्री माधुरी दीक्षित सूत्रसंचालिकेच्या भूमिकेत प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. त्यांच्या येण्यामुळे या लोकप्रिय कार्यक्रमात एका नव्या अध्यायाची सुरुवात होत आहे आणि नव्या विचारांचा, नव्या ऊर्जेचा आणि नव्या स्वप्नांचा प्रवास सुरू होणार आहे कारण 'आता खेळ बदलणार'...महाराष्ट्रातल्या घराघरांत पोहोचलेल्या या प्रतिष्ठित मंचावर आता अभिनेत्री माधुरी दीक्षि सूत्रसंचलिकेच्या भूमिकेत दिसणार आहेत.

# पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी तरुणांनी पुढाकार घ्यावा

## ॲड. वंदना चव्हाण यांचे मत; 'सीवायडीए'तर्फे जागतिक युवा दिनी 'ग्रीन युथ मुव्हमेंट'चे उद्‌घाटन

■ पुणे (दै. संध्या)

पुणे : "भारताच्या लोकसंख्येपैकी ५० टक्के लोकसंख्या ही तरुणांची आहे. तरुणांनी ठरवले, तर ते काहीही करु शकतात. येत्या काळात तरुणांनी पर्यावरणाशी निगडीत समस्या लक्षात घेऊन सामाजिक दायित्वाच्या भावनेतून पर्यावरण विषयात काम करायला हवे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी दूत म्हणून काम करावे," असे मत माजी खासदार ॲड. वंदना चव्हाण यांनी व्यक्त केले.




सेंटर फॉर युथ डेव्हलपमेंट अँड ॲक्टीव्हीटीज (सीवायडीए) यांच्यातर्फे जागतिक युवा दिनाच्या (१२ ऑगस्ट) निमित्ताने 'ग्रीन युथ मूव्हमेंट'चे उद्‌घाटन करताना त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर तेरे देस होमच्या डॉ. नम्रता जैटली, नगरसेवक ॲड. अविनाश साळवे, नगरसेविका सुमय्या नदाफ, सेंटर फॉर युथ डेव्हलपमेंट अँड ॲक्टीव्हीटीजचे संस्थापक संचालक मॅथ्यू मट्टम आदी उपस्थित होते.

ॲड. वंदना चव्हाण म्हणाल्या, "शहरात पूर्वी भर उन्हाळ्यातही फॅनची गरज लागत नव्हती. आता मात्र एसीशिवाय बसवत नाही. आता थोडा पाऊस झाला, तरी शहरात पूरस्थिती निर्माण होते. जागतिक तापमानवाढ आणि पर्यावरणाचा दिवसेंदिवस ऱ्हास होत असल्याने ही परिस्थिती उद्भवली आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे शहरांमध्ये कार्बन डायऑक्साईडचे उत्सर्जन वाढत आहे. आता याकडे दुर्लक्ष केले, तर येणाऱ्या पिढीला दप्तरात वह्या-पुस्तकांसोबत ऑक्सिजन सिलेंडर घेऊन फिरावे लागेल."

ॲड. अविनाश साळवे म्हणाले, "देशाप्रती आणि समाजाप्रती प्रत्येकाचे उत्तरदायित्व आहे. आज 'ग्रीन युथ मूव्हमेंट'च्या माध्यमातून युवाशक्ती पर्यावरण विषयात काम करण्यासाठी पुढे आली आहे. येत्या काळात आपण एकत्र मिळून कचरा व्यवस्थापन आणि पर्यावरण विषयात काम करुया."

मॅथ्यू मट्टम यांनी प्रास्ताविकात पर्यावरणाची चळवळ सुरु करण्यामागची भूमिका स्पष्ट करताना कचरा व्यवस्थापनाबाबत मानसिकता बदलल्याशिवाय भारत विकसित होणार नाही. स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापन यावर काम करण्यासाठी ही चळवळ उपयुक्त ठरेल, असे नमूद केले.

यावेळी या चळवळीची समन्वयक दिक्षा मेहेत्रे, नगरसेविका सुमय्या नदाफ आणि परमा नॅचरल्सच्या गीता प्रकाश यांनी मनोगत व्यक्त केले. देवेंद्र बनसोडे व आकांक्षा अहिरे यांनी सूत्रसंचालन केले. पौर्णिमा चलवादी हिने आभार मानले.

# शाहिराच्या कलेला साथ देणाऱ्या सहाध्यायांना मानाचा मुजरा

■ पुणे (दै. संध्या)

शाहिराच्या शब्दांना सुरांची साथ मिळते आणि रंगमंचावर लोककलेचा आविष्कार खुलतो; मात्र या सादरीकरणामागे खंबीरपणे साथ देणाऱ्या सहाध्यायांचे योगदान अनेकदा पडद्यामागेच राहते. शाहीराला सादरीकरणासाठी उभे करणाऱ्या या सहाध्यायांच्या मोलाच्या योगदानाची जाणीव ठेवत, त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी षष्ठ्यब्दीपूर्तीनिमित्त शाहिर हिंगे लोककला प्रबोधिनीच्या वतीने सहाध्यायांचा सन्मान करण्यात आला.




सदाशिव पेठेतील नारद मंदिर येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ गायक गुरुप्रसाद नानिवडेकर व ज्येष्ठ सनईवादक लक्ष्मणराव चव्हाण यांचा षष्ठ्यब्दीपूर्ती निमित्त सन्मान करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ गायक मुकुंद मराठे, ज्येष्ठ सनईवादक प्रमोद गायकवाड, प्रबोधिनीचे अध्यक्ष आचार्य शाहीर हेमंत मावळे, कार्याध्यक्षा प्रा. संगीता मावळे, सचिव अरुणकुमार बाभुळगावकर, रूपाली मावळे-देशपांडे आदी उपस्थित होते. यावेळी सनईवादक लक्ष्मणराव चव्हाण यांच्या सनईवादनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली, तर ज्येष्ठ गायक गुरुप्रसाद नानिवडेकर यांच्या गायनाने कार्यक्रमाचा समारोप झाला.

मुकुंद मराठे म्हणाले, आज संगीत हे केवळ मनोरंजनाचे साधन न राहता, भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि जीवनमूल्यांना आपल्या सुरांत गुंफणारे माध्यम आहे.

# यशवंत घारपुरे यांना 'डीएसटीए'चा विशेष पुरस्कार

■ पुणे (दै. संध्या)

दी डेक्कन शुगर टेक्नॉलॉजीज् असोसिएशनच्या (डीएसटीए) नुकत्याच पार पडलेल्या ७१ व्या वार्षिक अधिवेशनात हिंदुस्थान अँटीबायोटिक्सचे माजी व्यवस्थापकीय संचालक यशवंत घारपुरे यांना 'डीएसटीए' विशेष गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राज्याचे माजी गृह व अर्थमंत्री जयंत पाटील यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



सेनापती बापट रस्त्यावरील हॉटेल जेडब्ल्यू मॅरियटमध्ये येथे हा कार्यक्रम पार पडला. उद्योग, तंत्रज्ञान व व्यवस्थापन क्षेत्रातील प्रदीर्घ आणि उल्लेखनीय योगदानाबद्दल यशवंत घारपुरे यांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमावेळी माजी मंत्री राजेश टोपे व दिलीप देशमुख, राज्याचे साखर आयुक्त डॉ. संजय कोलते, माजी आयएएस अधिकारी डॉ. शेखर गायकवाड, कर्नाटकचे माजी मंत्री श्रीमंत पाटील, 'डीएसटीए'चे अध्यक्ष सोहन शिरगावकर आदी उपस्थित होते.

यशवंत घारपुरे हे 'डीएसटीए'सह गेल्या सात दशकांपासून विविध क्षेत्रात कार्यरत असून, त्यांनी रिसर्च आणि डेव्हलपमेंट संशोधक, शिफ्ट इंजिनिअर, सिनियर केमिकल इंजिनिअर, प्रोजेक्ट मॅनेजर, जनरल मॅनेजर अशा विविध पदांवर काम केलेले आहे. याबरोबरच घारपुरे यांनी विविध विषयांवर ३०० लेख लिहीले आहेत.

# स्मार्ट मीटरबाबत पुणे परिमंडलात व्यापक जनजागृती

■ पुणे (दै. संध्या)

स्मार्ट मीटरबाबत ग्राहकांच्या मनातील शंका, प्रश्न आणि गैरसमज दूर करण्यासाठी महावितरणच्या पुणे परिमंडलात व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. परिमंडलातील विविध मंडलांचे अधिकारी व कर्मचारी दररोज विविध गृहनिर्माण सोसायट्या, निवासी परिसर आणि ग्राहकांच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेटी देऊन स्मार्ट मीटरच्या कार्यपद्धतीची माहिती देत आहेत. ग्राहकांशी थेट संवाद साधून त्यांच्या शंकांचे निरसन करण्यावर या मोहिमेत विशेष भर देण्यात आला आहे.

पुणे परिमंडलात जुलै महिन्यात तब्बल ७२३ गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये जनजागृती मेळावे घेण्यात आले. त्यामध्ये १ लाख ६६ हजार ४०० ग्राहकांनी सहभाग नोंदविला. या उपक्रमादरम्यान ग्राहकांकडून प्राप्त झालेल्या १,२७४ वीजबिलविषयक तक्रारींपैकी ९१८ तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे.

स्मार्ट मीटरविषयी माहिती अधिक प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी पुणे शहरात दोन 'एलईडी व्हॅन' गर्दीच्या ठिकाणी फिरत असून, त्याद्वारे स्मार्ट मीटरच्या कार्यपद्धती व फायद्यांची माहिती देणारे व्हिडीओ दाखवून ग्राहकांचे प्रबोधन केले जात आहे.

दिवसा वीज वापरावर सवलत : सकाळी ९ ते सायं. ५ या दिवसाच्या वेळेत वीज वापराचे नियोजन केल्यास ग्राहकांना वीजखर्चात प्रतियुनिट ८५ पैशांची बचत करता येते. अचूक आणि मानवी हस्तक्षेपविरहित बिलिंग : स्मार्ट मीटरमुळे मीटर रीडिंगची प्रक्रिया अधिक स्वयंचलित होत असल्याने मानवी हस्तक्षेप कमी होऊन बिलिंग प्रक्रियेत अधिक अचूकता व पारदर्शकता येण्यास मदत होते.

# निवृत्ती नियोजनात उत्पन्नावरही लक्ष केंद्रित करणे आहे गरजेचे

■ पुणे (दै. संध्या)



अलीकडच्या काळात भारतात 'फायर' (आर्थिक स्वातंत्र्य, लवकर निवृत्ती) ही संकल्पना कॉर्पोरेट बैठका, सोशल मीडिया आणि संपत्तीविषयक अनौपचारिक चर्चांमध्ये मोठ्या प्रमाणावर चर्चेत आहे. प्रत्येकजण त्या एका 'जादुई आकड्याच्या' शोधात आहे. म्हणजेच अशा एका मोठ्या निधीच्या शोधात, जो निवृत्तीनंतरच्या काळात धावपळीचे आयुष्य मागे पडलेले असेल, तेव्हा सुरक्षित आणि सुखकर जीवन जगण्याची हमी देईल.

त्या अपेक्षित निधीच्या उद्दिष्टावर लक्ष केंद्रित करणे समजण्यासारखे आहे. अर्थात, अंतिम आकडा हा प्रत्येकाची जीवनशैली, आरोग्य आणि इतर गरजांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असेल. ही एक मूर्त आणि सहजपणे मागोवा घेता येण्यासारखी बाब आहे. परंतु, ती अपूर्णही आहे.


ॲक्सिस मॅक्स लाइफ इन्शुरन्स लिमिटेडमध्ये 'पार्टनरशिप चॅनल्स'चे मुख्य व्यवसाय अधिकारी आणि 'निवृत्ती' विभागाचे प्रमुख अनुराग गुप्ता म्हणाले की, मागील काही वर्षांत भारतीयांमध्ये निवृत्ती नियोजनाबाबतची जागरूकता वाढली आहे. परंतु, त्याचे रूपांतर पुरेशा तयारीत झालेले नाही. निवृत्तीच्या तयारीबाबतच्या एका अलीकडील उद्योग अहवालानुसार सर्वेक्षणात सहभागी झालेल्यांपैकी केवळ ३७ टक्के लोकांनीच त्यांच्या निवृत्तीसाठीच्या नियोजित निधीपैकी किमान एक चतुर्थांश निधी जमा केला होता; तसेच, दहापैकी सात जणांचा अजूनही असा विश्वास होता की १ कोटी रुपयांचा निधी पुरेसा ठरेल. मात्र वाढता खर्च आणि वाढलेले आयुर्मान पाहता ही रक्कम अपुरी पडण्याचीच शक्यता आहे.

संशोधनात असेही आढळून आले की, निवृत्तीनंतर आपली बचत दहा वर्षांहून अधिक काळ पुरेल, असा विश्वास केवळ एक-तृतीयांश प्रतिसादकर्त्यांनाच होता. उद्देश आणि प्रत्यक्ष कृती यांमधील ही तफावत हेच देशासमोरील निवृत्तीविषयक जोखमीचे मुख्य कारण आहे.

# महाराष्ट्राची बांधिलकी आसामच्या मदतीला; १२ लाख रुपयांची मदत

■ पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्राची ओळख केवळ पराक्रम, कष्ट आणि संघर्षाची नाही, तर संकटाच्या काळात माणुसकीसाठी उभे राहण्याचीही आहे. हीच महाराष्ट्राची 'बांधिलकी' पुन्हा एकदा देशासमोर आली आहे. आसाममधील भीषण महापुरामुळे संकटात सापडलेल्या कुटुंबांसाठी 'श्रीमान लेजेंड' आणि 'बांधिलकी परिवाराच्या' माध्यमातून तब्बल १२ लाख रुपयांची मदत उभी करण्यात आली आहे. श्रीमान लेजेंड हे गेमिंग आणि लाइव्ह स्ट्रीमिंगच्या माध्यमातून ओळखले जाणारे लोकप्रिय गेमिंग यूट्यूबर आहेत. गेमिंग हे त्यांचे प्रमुख क्षेत्र असले, तरी गेल्या अनेक वर्षांपासून त्यांनी आपल्या या व्यासपीठाचा उपयोग सामाजिक कार्यासाठीही केला आहे. मनोरंजन आणि गेमिंगपुरते व्यासपीठ मर्यादित न ठेवता गरजूंसाठी मदतीचा हात पुढे करण्याची भूमिका त्यांनी सातत्याने घेतली आहे. आसाममधील भीषण महापुरामुळे अनेक कुटुंबांचे संसार उद्‌ध्वस्त झाले. घरे, घरातील साहित्य आणि दैनंदिन गरजेच्या वस्तूंचे मोठे नुकसान झाले. ही परिस्थिती समोर आल्यानंतर श्रीमान लेजेंड यांनी लाइव्ह स्ट्रीमिंगच्या माध्यमातून चॅरिटी सुरू केली. तब्बल आठ तास चाललेल्या या लाइव्ह चॅरिटीमधून १० लाख रुपयांचा निधी जमा झाला. चॅरिटी संपल्यानंतरही मदतीची भावना कायम राहिली. दुसऱ्या दिवशी अनेक चाहते आणि समर्थक स्वतःहून पुढे आले आणि त्यांनी आणखी आर्थिक योगदान दिले. या अतिरिक्त योगदानासोबतच श्रीमान लेजेंड यांनी स्वतःकडूनही काही रक्कम जोडली. अशा प्रकारे आसामच्या पूरग्रस्तांसाठीची एकूण मदत १२ लाख रुपयांपर्यंत पोहोचली. ही मदत 'Sikh Aid' या संस्थेच्या माध्यमातून गरजूंपर्यंत पोहोचली असून, संस्थेकडून मदतीचे वाटप सुरू झाले आहे.



आसाममधील सुमारे २०० पूरग्रस्त कुटुंबांना गाद्या, गॅस शेगड्या, स्वयंपाकाची भांडी आणि इतर जीवनावश्यक वस्तू देण्यात येत आहेत. मदतीचे साहित्य संबंधित भागात पोहोचले असून, संस्थेच्या माध्यमातून त्याचे वितरण सुरू झाले आहे. याशिवाय पूरग्रस्त भागातील एका संपूर्ण गावातील मुलांच्या शिक्षणाची जबाबदारीही घेण्यात आली आहे. या मुलांच्या शालेय शुल्कासोबत गणवेश, स्कूल बॅग आणि आवश्यक शैक्षणिक साहित्य देण्याचे कामही संस्थेच्या माध्यमातून सुरू झाले आहे. त्यामुळे ही मदत केवळ आजच्या संकटापुरती मर्यादित न राहता, मुलांच्या भविष्यासाठीही आधार ठरणार आहे. आसाममधील नटालीगुरी भागात महापुरामुळे पूर्णपणे उद्‌ध्वस्त झालेली १० घरे दत्तक घेऊन त्यांचे पुनर्निर्माण करण्याचे कामही सुरू झाले आहे. या दहा कुटुंबांना नवीन बेड, गाद्या आणि आवश्यक घरगुती वस्तू देण्यात येत आहेत. घरांचे पुनर्निर्माण करून ती पुन्हा राहण्यायोग्य करण्याचे काम संस्थेकडून सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे पुरामुळे उद्‌ध्वस्त झालेल्या कुटुंबांना पुन्हा आपल्या घरात उभे राहण्याची नवी आशा मिळत आहे. श्रीमान लेजेंड यांचे सामाजिक कार्य केवळ आसामपुरते मर्यादित नाही. कोल्हापूर, सांगली तसेच महाराष्ट्रातील विविध पूरग्रस्त भागांमध्ये आणि महाराष्ट्राबाहेरील पूरग्रस्त भागांमध्येही त्यांनी मदतीचा हात पुढे केला आहे. कोविडच्या काळात, सैन्यासाठी तसेच गरजू महिला, मुले आणि अनाथाश्रमांसाठीही त्यांनी विविध माध्यमांतून मदत केली आहे. काही वेळा त्यांनी ही मदत कोणताही गाजावाजा न करता केली आहे. मदतीची प्रसिद्धी होण्यापेक्षा ती योग्य गरजूंपर्यंत पोहोचावी, हा त्यामागचा उद्देश राहिला आहे.

श्रीमान लेजेंड यांच्या या कार्यातून प्रेरणा घेत अनेक गेमिंग यूट्यूबर्स आणि स्ट्रीमर्सही सामाजिक मदतीसाठी पुढे येत आहेत. गेमिंगच्या माध्यमातून मिळालेली लोकप्रियता समाजासाठीही उपयोगी ठरू शकते, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले आहे. आसामसाठीची ही १२ लाखांची मदत केवळ आर्थिक योगदान नाही, तर संकटात सापडलेल्या कुटुंबांना पुन्हा उभे करण्याची 'बांधिलकी' आहे. महाराष्ट्राची ही माणुसकीची परंपरा श्रीमान लेजेंड यांनी पुन्हा एकदा देशासमोर आणली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे

### सशर्त वैधताधारकांनी आदिवासींच्या ३ हजार २०६ जागा अडवल्या!

**भिवंडी (सुनील झळके)**

राज्यातील १७ अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांपैकी तब्बल १२ समित्यांनी आजपर्यंत ३ हजार २०६ सशर्त जातवैधता प्रमाणपत्र निर्गमित केले आहे. त्यापैकी ३४३ प्रकरणांवर समित्यांनी निर्णय घेऊन त्या रद्द केलेल्या आहेत. अद्यापही अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांकडे २ हजार ८६३ सशर्त वैधतेची प्रकरणे प्रलंबित असल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहेत. राज्यात प्रमुख ४५ मूळ अनुसूचित जमाती आहे.त्यांच्या उपशाखा, पोटजाती मिळून एकूण १८१ जमाती आहेत. ४५ मूळ जमातींच्या नामसद्रुश्याचा फायदा लाटणाऱ्या बिगर आदिवासींच्या ३३ धनाढ्य, बलदंड जाती आहेत. नामसद्रुश जातींना जातपडताळणी समित्यांकडून अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र मिळाले नाही तर ते न्यायालयीन मार्गाचा अवलंब करुन सशर्त वैधता मिळवितात.याच आधारावर वैद्यकीय व अभियांत्रिकी या व्यावसायिक क्षेत्रातील अनुसूचित जमातीच्या राखीव जागा बळकावल्या जातात. सशर्त वैधताधारक हे कुटुंबातील ज्याच्या जातवैधतेवर अवलंबून आहे.अशा मूळ वैधताधारक असलेल्या ४ हजार ५२९ जातवैधता धारकांना तपासणी समित्यांनी नोटीस बजावली आहे. यापैकी ३ हजार २७५ जणांनी खुलाशे सादर केलेले आहे.३ हजार ९१७ जणांची सुनावणी घेण्यात आली आहे. राज्यात सर्वात जास्त सशर्त जातवैधता अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती किनवट - १ कडून १ हजार ५८३, छत्रपती संभाजीनगर समिती क्रमांक - २ कडून ४१८, छत्रपती संभाजीनगर समिती - १ कडून ४०२, किनवट समिती क्रमांक-२ कडून ३६६, नागपूर समितीकडून २१३, नाशिक समिती - २ कडून ८७, धुळे समितीकडून ८६ सशर्त वैधता निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.यवतमाळ, अमरावती, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर या पाच समित्याकडून एकही सशर्त वैधता निर्गमित करण्यात आलेले नाहीत.

"कुटुंबातील ज्यांच्या जातवैधतेवर सशर्त वैधताधारक अवलंबून आहे.अशांची वैधता तपासणी तात्काळ करुन प्रकरणे निकाली काढण्याची मागणी तत्कालीन टिआरटिआय पुणेच्या आयुक्त मंजिरी मनोलकर यांना निवेदन देऊन, सविस्तर चर्चा करुन करण्यात आली होती. कार्यवाही करण्याचे त्यांनी निर्देश दिले होते.परंतू अद्यापही सशर्त वैधतेची प्रकरणे निकाली निघाली नाहीत.

- ॲड. प्रमोद घोडाम
राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष ट्रायबल फोरम.



### ६६,९२८ हेल्थकेअर प्रॅक्टिशनर्सनी हिमालया वेलनेस कंपनीला नवीन गिनेस वर्ल्ड रेकॉर्ड्स

**मुंबई (दै.संध्या)**

हिमालया वेलनेस कंपनीला नवीन गिनेस वर्ल्ड रेकॉर्ड्स™ किताब मिळाला आहे. भारतभरातील 66,928 डॉक्टर आणि हेल्थकेअर प्रॅक्टिशनर्सनी डॉक्टर दिन (1 जुलै 2026) रोजी सुरू झालेल्या महिनाभराच्या वृक्षारोपण उपक्रमात सहभाग घेतला. या यशाने आधीचा 53,201 चा विक्रम मोडून नवीन इतिहास रचला आहे. हा किताब गिनेस वर्ल्ड रेकॉर्ड्स™ च्या "शाश्वततेबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी फलक हातात धरलेल्या लोकांचा सर्वात मोठा ऑनलाइन फोटो अल्बम" या श्रेणीत प्रदान करण्यात आला. सहभागी डॉक्टर आणि हेल्थकेअर प्रॅक्टिशनर्सनी "युनायटेड फॉर वेलनेस, युनायटेड फॉर अ ग्रीनर टुमॉरो" असा संदेश असलेले फलक हातात धरून आपले फोटो सबमिट केले. प्रत्येक नोंद गिनेस वर्ल्ड रेकॉर्ड्स™ च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार तपासून आणि प्रमाणित करून अंतिम आकडा निश्चित करण्यात आला. या यशाच्या व्यापक महत्त्वावर भाष्य करताना, हिमालया वेलनेस कंपनीच्या मुख्य वित्त अधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जयश्री उल्लाल यांनी सांगितले, "हिमालयामध्ये शाश्वतता ही आमच्या DNA मध्ये आहे. आम्ही घेतलेल्या प्रत्येक निर्णयाच्या केंद्रस्थानी शाश्वतता असते. ती आमच्या दीर्घकालीन दृष्टिकोनाचा भाग आहे आणि मूल्यनिर्मितीच्या प्रक्रियेतही आहे. हा विक्रम विशेष आहे कारण तो हिमालयाच्या 'केअर फॉर लाईफ' या तत्त्वज्ञानातील तीन पैलूंना एकत्र आणतो लोकांची काळजी, पृथ्वीची काळजी आणि 97 वर्षांच्या विश्वासावर उभारलेल्या भागीदारीची काळजी. डॉक्टरांसोबतच्या सहकार्यामुळे शाश्वतता ही सामूहिक जबाबदारी आहे हा प्रभावी संदेश अधिक बळकट झाला आहे. हा एकदाच होणारा उपक्रम नाही, निसर्गाला परत देणे ही आमची परंपरा आणि आजीवन बांधिलकी आहे. कारण हिमालयामध्ये आम्ही लावलेले प्रत्येक झाड हे पुढील पिढ्यांसाठी आरोग्य आणि हरित उद्याचे वचन आहे." या यशाबद्दल भाष्य करताना, हिमालया वेलनेस कंपनीचे हेल्थकेअर बिझनेस डायरेक्टर विकास बन्सी यांनी सांगितले, "आम्ही नेहमीच मानतो की निरोगी ग्रहाची जपणूक ही निरोगी लोकांसाठीची पायाभरणी आहे. हा उपक्रम केवळ जागतिक विक्रम मिळवण्यासाठी नव्हता, तर भारतातील वैद्यकीय समुदायाला एकत्र आणून उज्ज्वल आणि निरोगी उद्याचा संकल्प करण्यासाठी होता.

### 'लाईफ झिंगालाला'ला दोन दशक पूर्ण

**मुंबई (दै. संध्या)**


टाटा प्लेने आज आपल्या २० व्या वर्धापनदिनानिमित्त नवीन मोहिमेचे अनावरण केले. आपल्या प्रसिद्ध 'लाईफ झिंगालाला' टॅगलाईनची नव्याने पुनर्रचना करत ही मोहीम भारतातील लाखो कुटुंबांशी असलेले टाटा प्लेचे कायमस्वरूपी नाते दर्शवते आणि भारताच्या समृद्ध संगीत वारशाचा उत्सव साजरा करते. ओगिल्व्हीने संकल्पित केलेली ही मोहीम "लाईफ झिंगालाला असते तेव्हा नेमके कसे वाटते?" या सोप्या, पण भावना जागृत करणाऱ्या प्रश्नाभोवती डिझाइन करण्यात आली आहे. भारताच्या समृद्ध आणि विविध लोकसंगीत परंपरांच्या माध्यमातून टाटा प्लेच्या प्रसिद्ध टॅगलाईनची पुनर्रचना करत ही मोहीम देशभरातील लोकसंगीतकार आणि प्रादेशिक कलाकारांना एकत्र आणते. कार्तिक शाह यांच्या संगीत निर्मिती आणि दिग्दर्शनासह माटी बाणीच्या मूळ संगीत रचनेद्वारे जिवंत झालेली ही मोहीम प्रत्येक प्रदेशाच्या सांस्कृतिक ओळखीमध्ये रुजलेले अस्सल सादरीकरण मांडते. तमिळ, तेलुगू, कन्नड, बांगला, अवधी आणि गुजराती भाषांमध्ये सादर केलेले प्रत्येक रूप स्थानिक भाषा, संगीत वारसा आणि कथाकथनाच्या परंपरांमधून घेतलेले आहे, जे सीमारेषा ओलांडणाऱ्या मनोरंजनावरील सामायिक प्रेमावर भर देत भारताच्या सांस्कृतिक विविधतेचा उत्सव साजरा करते.
महाराष्ट्राच्या मूळ तारपा परंपरेचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी सन्मानित पद्मश्री श्री भिकल्या लाडक्या ढिंडा यांचा कलाकारांमध्ये समावेश आहे. किन्नेरा, ढोलक, हार्मोनियम, मशक, बांजो, जोडिया पावा, सुरांदो, नगारा आणि गुम्मेता यांसारखी पारंपारिक वाद्ये प्रत्येक संगीतरचनेला अस्सलता प्रदान करतात.

# कंबरदुखी आणि गुडघेदुखीवर विनाशत्रक्रिया उपचार

**(दै. संध्या)**

*बदलत्या जीवनशैलीमुळे ऐन तारुण्यात अनेक प्रकारचे आजार उदभवतात.आहाराची चुकीची पद्ध,प्रचंड धावपळ,दगदग आणि मुख्य म्हणजे शारीरिक श्रम अर्थात व्यायामाचा अभाव या कारणामुळे हल्ली अनेक तरुणांमध्ये देखील ऐन तिशीत कंबरदुखीचा आणि गुढगेदुखीचा आजार सुरु होताना दिसतोय. हाडांचे हे विकार सुरु होण्याचं मुख्य कारण म्हणजे मणक्याची चकती सरकणे आणि त्यामुळे मग कंबरेत प्रचंड वेदना सुरु होतात. गुडघ्याची वाटी देखील सरकते, त्यातील वंगण कमी झाल्यामुळे देखील गुढगेदुखीचा आजार उदभवतो. परंतु हाडाचे विकार म्हंटल कि, ते बरे करण्यासाठी फक्त शस्त्रक्रियाच असा एक गैरसमज जनमानसात रूढ असतो. पण, खरं तर हाडाचे ९९ टक्के आजार हे शस्त्रक्रियेविना बरे होऊ शकतात हे सत्य आहे ते कसे?हेच जाणून घेण्यासाठी सुप्रसिद्ध अस्थिव्यंगविकार तज्ज्ञ डॉ श्रीकृष्ण ढोणे यांच्याशी साधलेला संवाद.*





**१) गुढगेदुखी किंवा कंबरदुखी म्हटलं कि शस्त्रक्रियाच असा एक समज जनमानसात दिसतो परंतु हे दुखणे विना शत्रक्रिया बरे होऊ शकते या अंगची पार्शवभूमी नेमंकी काय सांगाल?**

शत्रक्रिया किंवा सर्जरी हे वैद्यकशास्त्राने आपल्याला दान दिलेले आहे. भाजीमध्ये आपण मीठ किंवा साखर अगदी चिमूटभर टाकतो अगदी तेवढाच शस्त्रक्रियेचा वापर करायचा असतो. हाडांचे जे आजार असतात त्यावर उपचारांचे सर्व मार्ग हाताळून पाहिल्यानंतर अगदी शेवटचा मार्ग म्हणजे शस्त्रक्रिया आहे. कंबर दुखी किंवा गुढगेदुखी का होते?तर शारीरिक व्यायामाचा अभाव, अरबट चरबट खाणे,मद्यपान,धूम्रपान अशी विविध व्यसन यामुळे पोटाचा घेर वाढतो.वजन प्रचंड वाढते आणि कंबर दुखी किंवा गुढगेदुखी सुरु होते.म्हणूनच, जर आहार पद्धती बदलली.दररोज व्यायाम नियमित केला, बैठका काढल्या ,आणि औषधांच्या मात्रा घेऊन या सर्व उपायांनी वजन नियंत्रित केले कि आपोआप कंबर दुखीचा किंवा गुढगेदुखीचा त्रास संपवता येतो.

**२) कंबरदुखीचा ज्यांना त्रास असतो त्यांच्या मणक्याची चकती सरकते ती पुन्हा व्यवस्थित करता येते का?**

होय, सरकलेली मणक्याची चकती पूर्ववत करण्यासाठी रुग्णाला ट्रॅक्शनचा उपचार अतिशय योग्य असतो. यामध्ये, रुग्णाच्या कमरेला पेल्वीस पासून अर्ध्या बाजूला वर आणि खाली सुमारे २५ ते ३० किलो वजन बांधतात आणि, यादरम्यान रुंगांचे जेवण कमी केलं जात. हा उपचार दोन तीन दिवस केला कि रुग्णाचे वजन कमी होते आणि त्याचे दुखणे देखील कमी होते. हा आपल्याकडचा खूप प्रभावी उपचार आहे.

**३) इंडियन मेथड ऑफ म्यानिप्युलेशन ऑफ स्पाईन म्हणजे काय ?**



ही उपचार पद्धती म्हणजे रुग्णांकरिता एक सिक्रेट आहे. जेंव्हा रुग्ण पाठदुखीचा किंवा कंबर दुखीचा आजार घेऊन रुग्णलयात येतात, तेंव्हा आम्ही त्याची त्याचे दोन्ही पाय पोटाजवळ घेऊन पाठ मोडतो त्यामुळे कट्कन आवाज येतो.जी सरकलेली डिस्क असते ती यामुळे पूर्ववत होते आणि ती आत जाते. या उपचारामुळे रुग्णाला देखील आनंद होतो तो त्याचे दुखणे अचानक बंद झाल्यामुळे.

**४) अनेक वयोवृद्धाना गुढगेदुखी आणि कंबरदुखीचा आजार असतो तो बरा करण्यासाठी उपाय काय?आणि पाठीचे स्नायू मजबूत केले तर हाडांची दुखणी कमी करता येतात का?**

ज्यांचं वय ७० च्या पुढे आहे, अशा वयोवृद्ध रुग्णांना कंबरदुखी आणि गुढगेदुखीचा आजार हा कॉमन असतो. अशा रुग्णांना गुढग्यामध्ये किंवा कंबरेत स्टिरॉइड चे इंजेक्शन देऊन हे दुखणे थांबवता येते. मात्र त्याच बरोबर अशा वयोवृद्धांनी आणि खरं तर सर्वच वयोगटातील रुग्णांनाही नियमित जलतरण करायला हवे .योगासन त्यातही सर्वांगासन नियमित करायला हवे. शारीरिक व्यायाम जोर बैठका काढायला हव्यात. भरपूर चालायला हवं आणि दररोज झोपताना पायांच्या मध्ये लोड घेऊन झोपायचे यामुळे कंबरदुखी आणि गुढगेदुखीचा त्रास थांबवता येतो. आपल्या शरीरातील स्नायूंची काळजी घेणं महत्वाचं असत .त्यासाठीच दररोज व्यायाम करावा . केवळ कॅल्शिअम च्या गोळ्या घेऊन उपयोग नाही . शरीराचे वजन नियंत्रित करणे अत्यंत महत्वाचे असते.

**संकलन : संयोजन**
सुशीलकुमार
मोबाईल -९६१९५८२८३५
ईमेल -
susheelkumar८०@yahoo.com

**आरोग्यनिती**
**लीलावती हॉस्पिटलची कझाकस्तानमध्ये सुपर-स्पेशालिटी आरोग्यसेवा**

लीलावती हॉस्पिटल, भारतातील सर्वात मान्यताप्राप्त आरोग्यसेवा संस्था सप्टेंबर २०२६ च्या सुरुवातीपासून कझाकस्तानमध्ये सुपर-स्पेशलिटी ओपीडी सुविधा सुरू करून आपल्या आंतरराष्ट्रीय उपस्थितीचा विस्तार करण्यासाठी सज्ज आहे.

हा उपक्रम लीलावती हॉस्पिटलचे विश्वासार्ह आरोग्यसेवा तज्ज्ञत्व भारताबाहेर नेण्याच्या आणि दृढ आंतरराष्ट्रीय आरोग्यसेवा उपस्थिती निर्माण करण्याच्या दीर्घकालीन दृष्टिकोनातील महत्त्वाचा टप्पा आहे.भारताबाहेर कार्यान्वित होणारी लीलावतीची पहिली आरोग्यसेवा सुविधा असलेला कझाकस्तान उपक्रम लीलावती हॉस्पिटलचे तज्ज्ञ सल्ला, दुसरे मत (सेकंड ओपिनियन), प्रगत उपचार नियोजन आणि वैद्यकीय तज्ज्ञत्व मध्य आशियातील रुग्णांच्या अधिक जवळ आणेल. हे केंद्र ऑन्कोलॉजी, लिव्हर आणि हेपॅटोबिलरी, किडनी आणि ट्रान्सप्लांटेशन, कार्डियाक सायन्सेस, न्यूरोलॉजी आणि न्यूरोसर्जरी, आयव्हीएफ आणि रीप्रॉडक्टिव्ह मेडिसिन, गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी, ऑर्थोपेडिक्स, युरोलॉजी, एंडोक्रिनोलॉजी आणि डायबिटीस, पेडियाट्रिक्स आणि पल्मोनोलॉजी या विभागांमध्ये सुपर-स्पेशलिटी सेवा प्रदान करेल. प्रगत उपचार आणि शस्त्रक्रियेची गरज असलेल्या गुंतागुंतीच्या केसेस लीलावती हॉस्पिटल मुंबईशी जोडल्या जातील.

लीलावती हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटरचे सीईओ डॉ. रवींद्र करंजेकर म्हणाले, "कझाकस्तानमधील आमचा विस्तार भारतातील विश्वासार्ह आरोग्यसेवा तज्ज्ञत्व जगापर्यंत पोहोचवण्याच्या आमच्या दृष्टिकोनातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. आम्हाला लीलावतीचे क्लिनिकल तज्ज्ञत्व, तज्ज्ञ सल्ला आणि प्रगत उपचार पद्धती मध्य आशियातील रुग्णांच्या अधिक जवळ आणायच्या आहेत. तसेच, हा उपक्रम तज्ज्ञ सल्ला, टेलिमेडिसिन, वैद्यकीय शिक्षण आणि डॉक्टरांमधील सहयोगाच्या माध्यमातून भारत-कझाकस्तान आरोग्यसेवा परिसंस्था तयार करण्याबद्दल आहे."

**३) ओळख वैद्यक उपकरणांची ऑटोक्लेव्ह**

ऑटोक्लेव्ह हे वैद्यकीय क्षेत्रातील एक महत्त्वाचे उपकरण आहे. उच्च दाबाखाली वाफेचा वापर करून सर्जिकल शस्त्रक्रियेचे साहित्य, ड्रेसिंग ड्रम, काचसामग्री आणि वैद्यकीय उपकरणे पूर्णपणे जंतुनाशक व निर्जंतुक करण्यासाठी याचा वापर केला जातो. हे बॅक्टेरिया, विषाणू आणि घातक बीजाणू नष्ट करते.

हे उपकरणाच्या आतील भागात उच्च दाब (साधारणपणे 15 psi) आणि तापमान (121°C) निर्माण करते. या तीव्र उष्णतेमुळे व वाफेमुळे सर्व सूक्ष्मजीव मरतात. सर्जिकल कात्री, फोर्सेप्स, प्रोक्टोस्कोप, ड्रेसिंग साहित्य आणि कापूस जंतुमुक्त करण्यासाठी. याचा वापर होतो.

याचे मुख्य प्रकारव्हर्टिकल ऑटोक्लेव, हॉरिझॉन्टल ऑटोक्लेव आणि टेबलटॉप ऑटोक्लेव हे आहेत.

•••

### जेएसडब्ल्यूने हेक्टरच्या ७ वर्षांच्या पूर्तीनिमित्त विशेष ॲनिव्हर्सरी प्रोग्रामची घोषणा केली

**■ मुंबई (दै. संध्या)**



भारतात आपल्या लोकप्रिय एसयूव्ही, एमजी हेक्टरच्या ७ वर्षांच्या यशस्वी पूर्ततेनिमित्त, जेएसडब्ल्यू एमजी मोटर इंडियाने आज ऑगस्ट २०२६ दरम्यान हे वाहन खरेदी करणाऱ्या ग्राहकांसाठी एका विशेष 'ॲनिव्हर्सरी प्रोग्राम'ची घोषणा केली आहे. एसयूव्ही खरेदीदारांसाठी असलेल्या या मर्यादित कालावधीच्या योजनेत ₹60,000 पर्यंतचे फायदे दिले जात आहेत, ज्यामध्ये एक्सचेंज बोनस, लॉयल्टी रिवॉर्ड्स, कॉर्पोरेट बेनिफिट्स आणि ॲनिव्हर्सरी डिस्काउंट्सचा समावेश आहे.

या यशावर भाष्य करताना, जेएसडब्ल्यू एमजी मोटर इंडियाचे मुख्य व्यावसायिक अधिकारी, विनय रैना म्हणाले: "एमजी हेक्टरने गेल्या सात वर्षांत एक अविश्वसनीय प्रवास केला आहे. तिने हजारो भारतीय कुटुंबांचा विश्वास संपादन केला आहे आणि एसयूव्ही सेगमेंटमधील अपेक्षांची पुनर्व्याख्या केली आहे. हा महत्त्वपूर्ण टप्पा साजरा करत असताना, आम्ही आमच्या ग्राहकांचे एका अशा ओनरशिप प्रोग्रामद्वारे आभार मानू इच्छितो, जो केवळ वाहनाच्या खरेदीपलीकडे जाऊन मूल्य प्रदान करतो.

### सूर्यकुमार यादव यांची जितो प्रीमियर लीगच्या ब्रँड ॲम्बेसेडरपदी नियुक्ती

**■ मुंबई (दै. संध्या)**



भारताचे माजी टी-२० कर्णधार सूर्यकुमार यादव यांची भारतातील सर्वात मोठी सामुदायिक क्रिकेट लीग असलेल्या जितो प्रीमियर लीगच्या पहिल्या हंगामासाठी ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या लीगचे आयोजन २४ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत श्रीलंकेतील कोलंबो येथे होणार आहे. जितो प्रीमियर लीगचे अध्यक्ष श्री विक्की ओसवाल यांनी व्यावसायिक पद्धतीने व्यवस्थापित फ्रँचायझी-आधारित क्रिकेट स्पर्धेची संकल्पना मांडली आहे. या स्पर्धेचा उद्देश क्रीडा क्षेत्रातील उत्कृष्टतेला चालना देणे, युवा प्रतिभेला विकसित करणे आणि जैन समाजासाठी शाश्वत जागतिक क्रीडा व्यासपीठ उभारणे हा आहे. या स्पर्धेत १२ फ्रँचायझी संघ, ३३ सामने आणि जैन समाजाचे प्रतिनिधित्व करणारे भारतभरातील सुमारे २५० अव्वल क्रिकेटपटू सहभागी होणार आहेत. प्रत्येक सामन्याचे थेट प्रक्षेपण प्रमुख ओटीटी प्लॅटफॉर्म, डिजिटल क्रीडा वाहिन्या आणि क्रिकेट स्कोअरिंग ॲप्लिकेशन्सवर केले जाणार असून त्यामुळे लीगला जागतिक स्तरावर प्रसिद्धी मिळणार आहे.

विक्की ओसवाल म्हणाले, "सूर्यकुमार यादव यांचे जितो प्रीमियर लीगचे ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून स्वागत करणे हा जेपीएलसाठी अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. त्यांचा प्रवास, व्यक्तिमत्त्व आणि यश आमची लीग ज्या उत्कृष्टता, जिद्द आणि क्रीडाभावाच्या मूल्यांचे प्रतिनिधित्व करते, त्याचे अचूक प्रतिबिंब आहे. जेपीएल ही केवळ क्रिकेट स्पर्धा नाही; तर पुढील पिढीला प्रेरणा देणारी आणि भारतातील सर्वाधिक प्रतिष्ठित क्रीडा मालमत्तांपैकी एक निर्माण करण्याचे ध्येय असलेली एक चळवळ आहे." सूर्यकुमार यादव उद्घाटन समारंभ तसेच उद्घाटनाच्या सामन्यास उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. याशिवाय स्पर्धेदरम्यान निवडक

### "आम्ही खरोखरच एक कुटुंब आहोत असं वाटलं"

#### 'द एंड ऑफ ओक स्ट्रीट'च्या कलाकारांबद्दल ॲन हॅथवे

**■ मुंबई (दै. संध्या)**




ॲकॅडमी अवॉर्ड विजेत्या ॲन हॅथवेला 'द एंड ऑफ ओक स्ट्रीट'च्या चित्रीकरणादरम्यान केवळ सह-कलाकारच नव्हे, तर एक कुटुंबच मिळालं. इवान मॅकग्रेगर, मेसी स्टेला आणि ख्रिश्चन कॉन्व्हेरी यांच्यासोबतच्या तिच्या केमिस्ट्रीची आठवण काढताना, हॅथवेने त्या विश्वास आणि नात्याबद्दल सांगितले, ज्यामुळे प्लॅट कुटुंब पडद्यावर आणि पडद्यामागेही एका खऱ्या कुटुंबासारखं वाटत होतं. तिने चित्रपटातील बझ आणि ब्रिस्केट या विशेष चार पायांच्या पात्रांचाही उल्लेख केला. हे नैसर्गिक नाते 'द एंड ऑफ ओक स्ट्रीट'चा भावनिक आधार बनले, जिथे एक रहस्यमय वैश्विक घटना प्लॅट कुटुंबाच्या उपनगरीय परिसराला महाकाय डायनासोरने भरलेल्या एका धोकादायक जगात ढकलते, ज्यामुळे कुटुंबाला एकमेकांवर अवलंबून राहावे लागते. वान मॅकग्रेगरसोबत काम करण्याबद्दल बोलताना, हॅथवेने तो एक उत्तम सह-कलाकार का आहे हे स्पष्ट केले. ती म्हणाली, "इवानसोबत काम करणे हा एक खूप आनंददायी अनुभव आहे. त्याच्यासोबत अभिनय करणे खूप मजेशीर आहे; शॉट्सच्या मध्ये दिग्दर्शकाच्या खुर्चीत त्याच्या शेजारी बसणे तितकेच छान वाटते. तो खूप गोड माणूस आहे आणि त्याला या भूमिकेत पाहण्यासाठी मी खूप उत्सुक होते. मला नेहमी वाटते की इवान त्याच्या प्रत्येक भूमिकेत एक उत्तम ऊर्जा आणि गंमत आणतो. त्यामुळे माझ्या पतीची भूमिका साकारणाऱ्या या अभिनेत्यासोबत माझी केमिस्ट्री कशी जुळेल आणि आमचे नाते कसे उलगडेल हे पाहण्यासाठी मी खूप उत्सुक होते. आणि मग, जेव्हा चित्रपटाचा ॲक्शन भाग सुरू झाला, तेव्हा इवानचे अनेक वर्षांचे स्टंट प्रशिक्षण अचानक कामी आले. तो अप्रतिम होता. म्हणजे, त्याने स्टंट इतक्या सहजतेने केले. हातोडा हातात असा फिरवला जणू काही ती लाईटसेबरच आहे. त्यामुळे तो खरोखरच अप्रतिम आहे, एक स्वप्नवत सह-कलाकार, खूप हसणारा, प्रत्येक बाबतीत ए-प्लस आहे." मेसी स्टेला आणि ख्रिश्चन कॉन्व्हेरी यांच्यासोबत काम करण्याच्या अनुभवाबद्दल सांगताना, हॅथवेने वर्णन केले की कलाकारांमध्ये किती लवकर एक खरे नाते निर्माण झाले, ज्यामुळे प्लॅट कुटुंब पडद्यावर आणि पडद्यामागेही अस्सल वाटले. ती म्हणाली, "ख्रिश्चन आणि मेसी दोघेही अविश्वसनीय प्रतिभावान अभिनेते आहेत. जेव्हा आम्ही हा चित्रपट बनवला, तेव्हा ख्रिश्चन खूप लहान होता, आणि त्याला या सर्व वेगवेगळ्या भावनिक अवस्थांमधून जाताना पाहणे आश्चर्यकारक होते, जिथे एक अभिनेता म्हणून त्याला अत्यंत भावनिक आणि एकाग्र राहावे लागत होते. आणि मग, 'कट' म्हटल्याबरोबर, तो पुन्हा लहान मुलासारखा वागू लागायचा. त्याला असे करताना पाहणे खूप आनंददायी होते. आणि या चित्रपटादरम्यान मी आणि मेसी खूप चांगल्या मैत्रिणी झालो; आमच्यात एक विशेष नाते निर्माण झाले. त्यामुळे ते खरोखरच कुटुंबासारखे वाटत होते, कारण आम्ही सर्वजण एकमेकांवर खूप प्रेम करू लागलो आणि एकमेकांवर विश्वास ठेवू लागलो. दररोज कामावर जाणे आणि नंतर या अद्भुत लोकांसोबत वेळ घालवणे हा एक खरा आनंद होता." हॅथवेला चित्रपटातील प्लॅट कुटुंबातील चार पायांच्या सदस्यांची आठवण आल्याशिवाय राहवले नाही, आणि तिने सांगितले की स्टारबकची भूमिका दोन प्रतिभावान कुत्र्यांनी साकारली होती, ज्या प्रत्येकाची स्वतःची खास वैशिष्ट्ये होती.

**फुरसुंगी उरुळी देवाची-नगरपरिषद**
फुरसुंगी. ता, हवेलीपुणे. जि, -४१२३०८
ई मेल- : fursungi.urulidevachinp2024@gmail.com

निविदा सूचना (२०२६-२७)
फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद, फुरसुंगी-उरुळी देवाची

फुरसुंगी-उरुळी देवाची नगरपरिषद मार्फत बांधकाम विभागाकडील विविध कामकाजाकरिता जागांची मोजणी व सर्व्हे करणे अनुषंगिक कामाकरिता दरपत्रक मागविणेत येत असून, सदर कामाकरीता दिनांक २४/०८/२०२६ रोजी दुपारी ०४.०० वाजेपर्यंत दरपत्रक फॉर्म नगरपरिषद बांधकाम विभागामध्ये मिळतील. सदर कामाकरीता सविस्तर निविदा सुचना व त्या संबंधित निविदेच्या अटी व शर्ती नगरपरिषद नोटीस बोर्डवर पहावयास मिळतील.

शिक्का

सही/-
मुख्याधिकारी फुरसुंगी
उरुळी देवाची नगरपरिषद

जा.क्र./फुउदेनप/बांध./१३२२/२०२६

**महाराष्ट्र वस्तू व सेवाकर विभाग**

सेवानिवृत्त राज्यकर अधिकारी/राज्यकर निरीक्षक करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत

वस्तू व सेवाकर विभागातील राज्यकर सहआयुक्त नोडल 1 पुणे या कार्यालयातील कामकाजाचा तसेच वस्तू व सेवाकर विषयक नोडल कामकाजाचा अनुभव असलेल्या गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्यासाठी नामिकासूची (Empanelment) तयार करावयाची आहे.

सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक सीबीई-1525/प्र.क्र37/आस्थामं (का. 13) दिनांक 10.06.2025 च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येणार आहे.

अधिक माहिती विभागाचे संकेतस्थळ https://mahagst.gov.in वर उपलब्ध आहे. इच्छुक व्यकीने संकेतस्थळावर माहिती पाहून त्यांचे अर्ज est01pune@gmail.com या ई मेल आयडीवर तसेच राज्यकर सहआयुक्त, नोडल-1 कार्यालय, नविन इमारत 1 ला मजला विमानतळ मार्ग, येरवडा, पुणे 411006 या पत्त्यावर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून 15 दिवसाच्या आत लेखी स्वरूपात सादर करावेत.

| कार्यालयाचे नाव व पत्ता | पदे | उपलब्ध पदांची संख्या | संपर्क |
|---|---|---|---|
| राज्यकर सहआयुक्त, नोडल 1 व 2 यांचे कार्यालय, पुणे विभाग, पुणे. वस्तू व सेवाकर भवन, 1 ला मजला विमानतळ मार्ग, येरवडा, पुणे 411006 | से नि रा अ/ से नि रा नि | १३ | est01pune@gmail.com |

सही/-
(डॉ. निलिमा नगरकर)
राज्यकर सहआयुक्त नोडल १ पुणे

विमाका/पुणे/जाहि. /१२३/२०२६-२७

## थोडक्यात पण महत्वाचे



### किवळेतील सेवा रस्त्याच्या कामाची गुणवत्ता तपासा

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतून जाणाऱ्या मुंबई-बंगळुरू महामार्ग (देहूरोड-कात्रज) बाह्यवळण मार्गावरील मामुर्डी ते वाकड दरम्यान सेवा रस्त्याचे काम भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या वतीने केले जात आहे. किवळे येथे ठेकेदाराने रस्त्यांचे काम अतिशय निकृष्ट झाले आहे. या कामाच्या गुणवत्तेची तपासणी करून आवश्यक सुधारणा करण्याची मागणी खासदार श्रीरंग बारणे यांनी केंद्र सरकारकडे केली आहे. खासदार बारणे यांनी रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. मावळ लोकसभा मतदारसंघातील देहूरोड बायपासपासून किवळे, रावेत मार्गे वाकडपर्यंत पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रात राष्ट्रीय महामार्गाच्या बांधकामाचे काम डीएमआर इन्फ्रा या ठेकेदारामार्फत करण्यात येत आहे. स्थानिक नागरिक तसेच लोकप्रतिनिधींकडून सातत्याने प्राप्त होत असलेल्या तक्रारीनुसार सदर काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः किवळे जंक्शन येथे दोन्ही बाजूंना बांधण्यात आलेल्या अंडरपासचे कामदेखील गुणवत्तापूर्ण झालेले नाही. रस्ते बांधकामासाठी आवश्यक मानकांचे पालन न केल्यामुळे अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे निर्माण झाले आहेत. तसेच स्टॉर्म वॉटर ड्रेनेज (पावसाच्या पाण्याचा निचरा) व्यवस्था योग्य प्रकारे करण्यात आलेली नसल्यामुळे पावसाचे पाणी रस्त्यावर साचते. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन अपघातांची शक्यता वाढली आहे. तसेच सर्व्हिस रोडची स्थितीही अत्यंत खराब आहे. याबाबत स्थानिक नागरिकांकडून वारंवार तक्रारी प्राप्त होत आहेत. या मार्गावर सुमारे ८.२५ किलोमीटर लांबीच्या एलिव्हेटेड रोडचे बांधकाम प्रस्तावित आहे. त्यामुळे सध्या सुरू असलेल्या बांधकामाच्या गुणवत्तेची निष्पक्ष व तांत्रिक तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे,.जेणेकरून भविष्यातील प्रस्तावित कामदेखील निर्धारित मानकांनुसार होईल. हा रस्ता व अंडरपासच्या बांधकामाच्या कामाची उच्चस्तरीय गुणवत्तेची तपासणी करण्यात यावी. तपासणीमध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता अथवा निकृष्ट दर्जाचे काम आढळून आल्यास संबंधित ठेकेदाराविरुद्ध आवश्यक ती कारवाई करण्यात यावी. तसेच रस्ता, अंडरपास, स्टॉर्म वॉटर ड्रेनेज आणि सर्व्हिस रोडचे पुनर्बांधकाम निर्धारित गुणवत्तेच्या मानकांनुसार करून घेण्यात यावे, अशी मागणी खासदार बारणे यांनी केली. रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी तत्काळ संबंधित ठेकेदार कंपनीच्या अधिकाऱ्यांना दूरध्वनी केला. कामाचा दर्जा सुधारावा. निकृष्ट दर्जाचे काम खपवून घेतले जाणार नाही. कामात सुधारणा न झाल्यास काम काढून घेण्याचा आणि ठेकेदाराला टर्मिनट करण्याचा इशारा गडकरी यांनी दिला.

### महापालिका प्रशासन जागे कधी होणार? : शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी-चिंचवड शहरात मोकाट, भटक्या कुत्र्यांची संख्या एक लाखाच्या पुढे गेली आहे. मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याकडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. कुत्र्यांची संख्या लाखाच्या पुढे असताना मागील पाच वर्षात केवळ ४३ हजार ६४४ कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्यात आल्याचे सांगितले जात आहे. प्रत्यक्षात प्रशासनाकडे यासंदर्भात कोणतीही अचूक आणि सुटसुटीत माहिती उपलब्ध नसून, भटक्या कुत्र्यांच्या समस्येकडे होणाऱ्या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. महापालिका प्रशासन जागे कधी होणार आहे, असा सवाल शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे यांनी केला आहे. गटनेते विश्वजीत बारणे म्हणाले, चिखलीतील म्हेत्रे वस्ती परिसरात चार वर्षीय मुलीवर मोकाट कुत्र्यांनी हल्ला केला. त्यात मुलगा गंभीर जखमी झाली आहे. मोकाट कुत्र्यांमुळे लहान मुलांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पिंपरी-चिंचवड शहरात मोकाट आणि भटक्या कुत्र्यांची समस्या कायम असून मागील चार महिन्यात १३ हजार ६१५ जणांना कुत्र्यांनी चावा घेतला आहे. शहर परिसरात भटक्या कुत्र्यांची वाढती संख्या ही अत्यंत गंभीर समस्या बनली आहे. ३० ते ३५ लाख लोकसंख्येच्या शहरात प्रत्यक्षात एक लाखांपेक्षा अधिक मोकाट कुत्री आहेत. लहान मुलांवर हल्ल्यांच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. नागरीवस्ती भागांमध्ये भटक्या कुत्र्यांचा वावर वाढल्याने नागरिकांवर आणि लहान मुलांवर हल्ले होण्याच्या घटना घडत आहेत. न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार भटक्या कुत्र्यांच्या संख्येवर नियंत्रण मिळवणे आवश्यक असताना महापालिकेने केवळ एकच नसबंदी केंद्र उभारले आहे. शहराच्या विविध भागांमध्ये पुरेसे नसबंदी केंद्र उपलब्ध करण्यात महापालिका पूर्णपणे निष्फळ ठरली आहे. महापालिका विविध कामांवर कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी करत असताना, भटक्या कुत्र्यांच्या नियंत्रणासाठी आणि नसबंदी मोहिमेसाठी बजेटमध्ये आवश्यक ती ठोस आर्थिक तरतूद करण्यात आलेली नाही. रेबीज प्रतिबंधक लसी आणि इंजेक्शन्स उपलब्ध असल्याचा दावा केला जात असला, तरी प्रत्यक्षात भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करणे, त्यांना पकडणे आणि नसबंदी मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात महापालिका प्रशासन पूर्णपणे अपयशी ठरले आहे.

### वाकडच्या दत्त मंदिर रोडवर 'रोल मॉडेल हरित मार्ग' विकसित करा

**पिंपरी : दैनिक संध्या**

वाकड येथील ४५ मीटर रुंदीच्या दत्त मंदिर रोडवर मोठ्या प्रमाणावर देशी व पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करून पिंपरी-चिंचवड शहरातील एक आदर्श 'रोल मॉडेल हरित मार्ग' विकसित करण्यात यावा, अशी मागणी नगरसेविका स्नेहा रणजित कलाटे यांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन सादर केले. वाढती लोकसंख्या, वाहनांची संख्या आणि झपाट्याने होत असलेले नागरीकरण यामुळे वाढणारे प्रदूषण लक्षात घेता नागरिकांना स्वच्छ, सुंदर आणि निरोगी वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी दत्त मंदिर रोडच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करणे आवश्यक असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. हा उपक्रम केवळ वृक्षलागवडीपुरता मर्यादित न ठेवता सुयोग्य हरित रचना, सावली देणारी वृक्षसंरचना, पर्यावरणपूरक सुशोभीकरण, नियमित देखभाल आणि योग्य संगोपन यांच्या माध्यमातून विकसित करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. उपलब्ध जागेचे सर्वेक्षण करून वड, पिंपळ, कडुनिंब, करंज, अर्जुन, जांभूळ, बहावा, कांचन, चिंच आणि आवळा यांसारख्या स्थानिक हवामानाला पूरक देशी वृक्षांची लागवड करण्याचा प्रस्तावही त्यांनी मांडला आहे.


# मोशी कचरा डेपोत बायो-सीएनजी प्रकल्पावरून राजकीय वाद

## भाजपवर महापालिका लुटीचा विरोधकांचा गंभीर आरोप

**■ पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने सार्वजनिक खासगी भागीदारी (डीबीएफओटी) तत्त्वावर ओल्या कचऱ्यापासून बायो-सीएनजी निर्मितीचा ३७५ टन क्षमतेचा प्रकल्प मोशी कचरा डेपोत राबवण्यात येत आहे. भाजपाच्या स्थानिक नगरसेवकांचा डेपोत कचरा टाकण्यास विरोध असताना तेथे नवीन प्रकल्पाचा घाट कोणाच्या भल्यासाठी घातला जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नाव पुढे करून खर्चिक प्रकल्पांच्या नावाने महापालिकेची लूट करण्याचा घाट घातला जात आहे, असा गंभीर आरोप विरोधकांनी सत्ताधारी भाजपवर केला आहे.

पत्रकार परिषदेत स्थायी समितीचे सदस्य सुलभा उबाळे व संदीप वाघेरे यांनी सांगितले की, महापालिकेच्या मोशी कचरा डेपोतील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पातील अनधिकृत प्रशासकीय इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत ९ कर्मचाऱ्यांचा बळी गेला. ती घटना ताजी असताना मोशी डेपोतच नवीन प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्यावरून विरोधकांनी आयुक्तांसह सत्ताधारी भाजपाला धारेवर





धरले. कचऱ्यातून मलिदा लाटण्यासाठी मूळ दरापेक्षा तिपटीपेक्षा अधिक दराने राबवला जात आहे. त्यातून महापालिकेची लूट होणार आहे. मुख्यमंत्र्यांचे नाव पुढे करून इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पांनंतर ओल्या कचऱ्यापासून सीएनजी निर्मितीचा प्रकल्पाचा घाट घातला आहे. सीएनजी प्रकल्पासाठी ठेकेदाराला न पोसता महापालिकेने स्वतः हा प्रकल्प उभारावा. त्यातून महापालिकेस दरवर्षी १ कोटी ७३ लाख ३७ हजार ५०० रुपये उत्पन्न मिळेल. तसेच, अनेक कंपन्या हे काम मोफत तयार करण्यासाठी तयार आहेत. त्याकडे दुर्लक्ष करून महापालिका खड्ड्यात टाकण्याचा डाव सत्ताधारी भाजपाने चालवला आहे, असा आरोप उबाळे व वाघेरे यांनी केला.

### आमच्यावर कोणाचा दबाव नाही

घरगुती ओल्या कचऱ्यापासून सीएनजी निर्मिचा प्रकल्पाचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर अद्याप आलेला नाही. प्रस्ताव आल्यानंतर त्यावर अभ्यास केला जाईल. सादरीकरण केले जाईल. दोषी मुख्य अभियंता संजय कुलकर्णी यांचा तो प्रकल्प डोळे झाकून राबणार नाही. सर्व बाजूने अभ्यास करून सर्वसहमतीने निर्णय घेतला जाईल. मोशी कचरा डेपोसारखी दुर्घटना पुन्हा घडू नये म्हणून सर्व प्रकाराची दक्षता घेतली जाईल. मोफत प्रकल्प चालवण्यासाठी कोणी तयार असल्यास तसा प्रस्ताव आयुक्तांना दिला जाईल, असे स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी सांगितले.

दोषी मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, तसेच सल्लागार टंडन यांनी तो प्रकल्प तयार केला आहे. टंडन याला आतापर्यंत ३० कोटी रुपये शुल्क दिले गेले आहे. दोषी अधिकाऱ्यांचे प्रकल्प प्रशासनाने राबवू नये. विरोध डावलून सत्ताधाऱ्यांनी प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतल्यास जनआंदोलन छेडले जाईल. मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करू. प्रसंगी न्यायालयात दाद मागू, असा इशारा त्यांनी दिला आहे. या वेळी सदस्य विकास साने उपस्थित होते...असा आहे प्रकल्प

मोशी कचरा डेपोत हॉटेल वेस्टपासून सीएनजी निर्मितीचा प्रकल्प सुरू आहे. आता, तेथेच घरगुती ओल्या कचऱ्यापासून सीएनजी निर्मितीचा ३७५ टन क्षमतेचा प्रकल्प सुरू केला जाणार आहे. ते काम एसएमसी इन्फ्रा. प्रा. लि. या ठेकेदाराला १६ वर्षे ९ महिने कालावधीसाठी देण्यास महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी मान्यता दिली आहे. तो प्रस्ताव मंजुरीसाठी स्थायी समितीसमोर ठेवला जाणार आहे. ऐनवेळी मंजुरी देऊन त्या प्रस्तावाला गुपचूप मंजुरी देण्याचा प्रयत्न सत्ताधाऱ्यांकडून सुरू असल्याचा आरोप सुलभा उबाळे व संदीप वाघेरे यांनी केला आहे. त्या ठेकेदाराला ३ हजार ६६१ रुपये प्रतिटन दराने टिपींग चार्जेस देण्यात येणार आहे. दररोज आठ टन सीएनजी निर्माण केला जाणार आहे. तो सीएनजी ठेकेदार विकून उत्पन्न मिळवणार आहे.

# "ज्ञानसूर्य" पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांना शोकसभेत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण

**■ पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी : डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ), पिंपरी येथे काल (१२ ऑगस्ट २०२६) सायंकाळी माजी राज्यपाल आणि डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण समूहाचे संस्थापक पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील (दादा) (ज्ञानदेव यशवंतराव पाटील) यांच्या शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थित राहून पाटील परिवाराचे सांत्वन केले व दिवंगत आत्म्यास भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.


पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील (ज्ञानदेव यशवंतराव पाटील) दादांच्या निधनाने शिक्षणविश्वावर तीव्र शोककळा पसरली असून, एका महान युगाचा अंत झाला आहे. ज्ञान, संस्कार, दूरदृष्टी आणि मानवतेचा अखंड दीप प्रज्वलित ठेवणारे एक थोर शिक्षणमहर्षी म्हणून दादा ओळखले जात. वयाच्या ९० व्या वर्षी त्यांचे निधन झाल्याने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्राची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे.

पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांनी केवळ शैक्षणिक संस्थांचे जाळे उभे केले नाही, तर लाखो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आकार दिला, नैतिक मूल्यांची जोपासना केली आणि शिक्षणाला खऱ्या अर्थाने समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम बनवले. त्यांचे दूरदर्शी नेतृत्व, साधेपणा, मानवतावादी दृष्टिकोन आणि शिक्षणाप्रती असलेली अखंड निष्ठा येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी सदैव मार्गदर्शक ठरेल.

पाटील परिवाराकडून सांत्वनपर भेटीचा स्वीकार: याप्रसंगी डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या प्र-कुलपती व ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटीच्या कुलपती व अध्यक्षा डॉ. सौ. भाग्यश्री पी. पाटील, डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी (अभिमत विद्यापीठ), कोल्हापूरचे कुलपती व अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष व आमदार श्री. सतेज डी. पाटील, ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटीचे प्र-कुलपती व डॉ. डी. वाय. पाटील युनीटेक सोसायटीचे सचिव डॉ. सोमनाथ पी. पाटील, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू व डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सोसायटीच्या सचिव डॉ. सौ. स्मिता जाधव, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सोसायटी, पुणेचे विश्वस्त व खजिनदार डॉ. यशराज पी. पाटील यांच्यासह पाटील परिवारातील सदस्यांनी उपस्थितांच्या सांत्वनपर भेटींचा स्वीकार केला. या शोकसभेला शैक्षणिक, औद्योगिक, राजकीय, साहित्यिक, सामाजिक, क्रीडा, कृषी, अध्यात्मिक, शासकीय व वैद्यकीय क्षेत्रांतील असंख्य मान्यवर उपस्थित होते. तसेच शिक्षण समूहातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संपूर्ण विद्यापीठ सभागृह शोकाकुल वातावरणात बुडून गेले होते. उपस्थितांनी दादांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या पवित्र स्मृतीस अत्यंत नम्रभावाने अभिवादन केले.

### निरंतर सेवेचे प्रतीक

"दादांचे संपूर्ण आयुष्य हे मानवता, वात्सल्य आणि निरंतर सेवेचे प्रतीक होते. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षणाची गंगा पोहोचावी, ही त्यांची धडपड असायची. त्यांची तीच दूरदृष्टी, साधेपणा आणि आपुलकी आजही आपल्या सर्वांच्या मनात जिवंत आहे. दादांचे विचार आणि त्यांचे आशीर्वाद कायम आपल्या पाठीशी राहतील, असे डॉ. भाग्यश्री पी. पाटील (प्र-कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ व अध्यक्षा, ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी) सांगितले.





# गणेश मंडळांना मंडप परवानगी शुल्क माफ करा



**■ पिंपरी (दै. संध्या)**

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना दिलासा देण्यासाठी गणेश मंडप परवानगी शुल्क पूर्णपणे माफ करावे तसेच मंडप उभारणीसाठी दरवर्षी परवानगी घेण्याऐवजी सलग तीन वर्षांसाठी एकत्रित परवानगी देण्याची मागणी नगरसेविका रिटा सचिन सानप यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि महापौर रवि लांडगे यांच्याकडे केली आहे.

यासंदर्भात आयुक्तांना दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहरातील गणेशोत्सवाला ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरा लाभली असून महाराष्ट्रासह देशभरातून भाविक आणि पर्यटक हा उत्सव पाहण्यासाठी येतात. शहरातील सार्वजनिक गणेश मंडळे अनेक वर्षांपासून हा उत्सव उत्साहात, शिस्तबद्ध पद्धतीने आणि सामाजिक बांधिलकी जपत साजरा करत आहेत.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून विविध मंडळांकडून सामाजिक, सांस्कृतिक आणि प्रबोधनात्मक उपक्रम राबवले जातात. पूर्वी महानगरपालिकेकडून मंडळांना आर्थिक मदत दिली जात होती, मात्र सध्या मंडप परवानगीसाठी मोठ्या प्रमाणावर शुल्क आकारले जात असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. नगरसेविका रिटा सानप यांनी गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेशी निगडित असलेला महत्त्वाचा सण असल्याचे सांगत मंडळांवरील आर्थिक भार कमी करण्यासाठी मंडप परवानगी शुल्क माफ करण्याची मागणी केली आहे. तसेच दरवर्षी नव्याने कागदपत्रे सादर करून परवानगी घेण्याच्या प्रक्रियेमुळे कार्यकर्त्यांचा वेळ आणि श्रम खर्च होत असल्याने सलग तीन वर्षांसाठी एकत्रित परवानगी देण्याची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. सर्व सार्वजनिक गणेश मंडळे महानगरपालिकेच्या नियमांचे तसेच सुरक्षाविषयक अटींचे काटेकोर पालन करतील, अशी ग्वाही देत महानगरपालिका प्रशासनाने या मागणीचा सहानुभूतीपूर्वक आणि सकारात्मक विचार करावा, अशी अपेक्षा नगरसेविका रिटा सचिन सानप यांनी व्यक्त केली आहे.

# भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या हल्ल्यांबाबत तातडीने उपाययोजना करा

**■ पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरातील वाढत्या भटक्या कुत्र्यांच्या समस्येमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, या गंभीर समस्येवर तातडीने आणि प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी माजी विरोधी पक्षनेते तथा नगरसेवक विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्तांकडे केली आहे.

याबाबत आयुक्तांना दिलेल्या निवेदनात नाना काटे यांनी म्हटले आहे की, शहरातील विविध भागांमध्ये भटक्या कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून नागरिक, महिला आणि लहान मुलांवर हल्ल्यांच्या घटना सातत्याने घडत आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

अलीकडेच चिखली परिसरात एका लहान मुलीवर चार ते पाच भटक्या कुत्र्यांनी हल्ला केल्याची गंभीर घटना घडली. तसेच रावेत येथील सिटी प्राईड शाळेजवळ एका महिला व मुलीचा दुचाकीवरून पाठलाग करून त्यांना खाली पाडण्याचा आणि कपड्यांना तोंडाने ओढण्याचा प्रयत्न भटक्या कुत्र्यांनी केल्याची घटना घडली. अशा घटनांमुळे नागरिकांमध्ये मोठी चिंता व्यक्त केली जात आहे.

शहरातील शाळा, उद्याने, सोसायट्या, बाजारपेठा आणि नागरिकांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असलेल्या परिसरांमध्ये भटक्या कुत्र्यांची टोळकी मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहेत. त्यामुळे पालकांमध्ये आपल्या मुलांच्या सुरक्षेबाबत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाने संपूर्ण शहरातील भटक्या कुत्र्यांचे सर्वेक्षण करून निर्बीजीकरण (ABC) आणि रेबीज प्रतिबंधक लसीकरण मोहीम अधिक प्रभावीपणे राबवावी, अशी मागणी नाना काटे यांनी केली आहे. तसेच नागरिकांना धोका निर्माण करणाऱ्या आक्रमक कुत्र्यांबाबत तातडीने आवश्यक ती कार्यवाही करण्याचीही मागणी त्यांनी केली आहे.

याशिवाय शाळा, महाविद्यालये, उद्याने आणि संवेदनशील परिसरांमध्ये विशेष पथके नियुक्त करून भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात. नागरिकांच्या तक्रारींसाठी प्रभावी हेल्पलाइन आणि तातडीची प्रतिसाद यंत्रणा उपलब्ध करून देण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

नागरिकांच्या जीविताची आणि सुरक्षिततेची जबाबदारी महानगरपालिकेची असून कोणतीही मोठी दुर्घटना घडण्याची वाट न पाहता प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत, असे नाना काटे यांनी निवेदनात नमूद केले आहे.



## थोडक्यात पण महत्वाचे



### चाकणला गाजला सावतामाळी महाराज संजीवन समाधी सोहळा

**चाकण : दैनिक संध्या**

भजन, दिंडी सोहळा, भव्य मिरवणूक, झिम्मा फुगडी आदी भरगच्च कार्यक्रमांनी चाकण येथे श्री संत सावतामाळी महाराज संजीवन समाधी सोहळा गाजला. समाज बांधवांनी यंदा या कार्यक्रमाची जोरदार तयारी केली होती. श्री संत शिरोमणी सावतामाळी महाराज संजीवन समाधी सोहळा समितीच्या वतीने चाकण येथे या धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. चाकण येथील चक्रेश्वर मंदिरालगतच्या श्री संत सावतामाळी महाराज मंदिरात या कार्यक्रमाची जोरदार तयारी करण्यात आली होती. सोहळ्याच्या दिवशी सकाळी श्रींचा अभिषेक करण्यात आला. त्यानंतर सावता महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. येथील माळ आळीतील श्री संत सावतामाळी मंदिरा पासून चक्रेश्वर मंदिरापर्यंत श्री संत ज्ञानेश्वर महाराज वारकरी शिक्षण संस्थेचे ह.भ.प. मुकुंद महाराज चौधरी व विद्यार्थ्यांची दिंडी व प्रतिमा मिरवणूक काढण्यात आली होती. या लक्षवेधी मिरवणुकीत चाकणकर समाज बांधव प्रचंड मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सावता महाराजांच्या नामघोषाने अवघा परिसर भक्ती रसात चिंब झाला होता. या सोहळ्याची यंदा जोरदार तयारी करण्यात आल्याने समाज बांधवांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. राणूबाईमळा येथील जय गणेश महिला भजनी मंडळ व झित्राई माता महिला भजनी मंडळ यांचा सांप्रदायिक भजनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळी भाविकांनी श्रवण सुखाबरोबर महाप्रसादाचा लाभ घेतला.

### चाकण पतसंस्थेच्या अध्यक्षपदी निलेश टिळेकर



**चाकण : दैनिक संध्या**

चाकण नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी निलेश बबनराव टिळेकर यांची, तर उपाध्यक्षपदी साधना दिपक गोरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. चाकण पतसंस्थेच्या संचालक मंडळाच्या निवड प्रक्रियेत अध्यक्ष व उपाध्यक्ष या दोन पदांसाठी एकमताने निर्णय घेण्यात आला. निलेश टिळेकर व साधना गोरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी संस्थेचे संचालक नवनाथ शेवकरी, गिरीश गोरे, नगरसेवक तथा माजी अध्यक्ष नितीन गोरे, सुनील नायकवाडी, गोरक्षनाथ कांडगे, अशोक बिरदवडे, लक्ष्मण वाघ, सुरेश कांडगे, बाळासाहेब साळुंके, प्राजक्ता गोरे, समीर सिकीलकर, अंकुश पवार, पांडुरंग गोरे, अनिल शेवकरी, व्यंकटेश सोरटे, भरत डोंगरे, नारायण ढेंबे, लक्ष्मण मुऱ्हे, नितीन बोत्रे, पांडुरंग बनकर, धनंजय शेवकरी, केशव गोरे आदी उपस्थित होते. चाकण पतसंस्थेची प्रगती अधिक गतिमान करून सभासदांच्या हिताला प्राधान्य देऊ, असे आश्वासन टिळेकर व गोरे यांनी दिले.

### अल्पवयीन व मतिमंद मुलीवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला फाशीची शिक्षा द्यावी

**जेजुरी : दैनिक संध्या**

जेजुरी पोलिस स्टेशन हद्दीतील कोळविहिरे येथे एका 60 वर्षाच्या नराधमाने 10 वर्षाच्या अल्पवयीन व मतिमंद मुलीवर अत्याचार केले . या नराधमाला फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी पीडितेच्या आईने केली आहे. दिनांक 11 रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास कोळविहिरे येथे एका 10 वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर अत्याचाराची घटना घडली . पोलिसांनी आरोपी झुंबर सीताराम खोमणे वय 60 या नराधमाला अटक करून त्याच्यावर पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या घटनेबाबत प्रसार माध्यमांशी बोलताना पीडित अल्पवयीन मुलीची आईने सांगितले की नराधम आरोपी आमच्या घरा समोर राहत असून माझी मुलगी अल्पवयीन व थोडी मतिमंद असून ही मुलगी या आरोपीच्या घरी असणाऱ्या नातवंडा बरोबर नेहमी खेळण्यास जात असतं. मंगळवार दिनांक 11 रोजी दुपारी साडे बारा वाजण्याच्या सुमारास माझी मुलगी त्याच्या घरी गेली असता तिला या नराधमाने आपण सीताफळाच्या बागेत जाऊन सीताफळे घेऊन येऊ असे सांगून तो मुलीला बागेत घेऊन गेला. व तिथे तिच्यावर अत्याचार केले. असा प्रकार इतर कोणत्याही मुलीवर होऊ नये यासाठी या नराधमाला फाशीची शिक्षा झाली पाहिजे अशी मागणी त्यांनी केली आहे. या अल्पवयीन व मतिमंद मुलीवर अत्याचार झाल्याने परिसरातील नागरिकांच्या संतापाची भावना निर्माण झाली आहे.

### युवा शक्ती, हत्ती संवर्धन आणि खगोलीय अद्भुततेचा विशेष दिवस

**कवठे येमाई : दैनिक संध्या**

ग्रेगोरियन दिनदर्शिकेनुसार वर्षातील हा २२४ वा दिवस असून वर्ष संपण्यासाठी आणखी १४१ दिवस शिल्लक आहेत. आजचा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय युवा दिन आणि जागतिक हत्ती दिन म्हणून साजरा केला जातो. यंदाच्या १२ ऑगस्टला आकाशात घडणाऱ्या संपूर्ण सूर्यग्रहणामुळे या दिवसाला आणखी विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. तरुणाई ही कोणत्याही देशाच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विकासाची महत्त्वाची शक्ती मानली जाते. तरुणांच्या समस्या, रोजगार, शिक्षण, कौशल्यविकास, आरोग्य, समान संधी आणि निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी १२ ऑगस्ट रोजी आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने १९९९ मध्ये १२ ऑगस्ट हा दिवस आंतरराष्ट्रीय युवा दिन म्हणून मान्य केला. आजच्या काळात शिक्षणाबरोबरच डिजिटल कौशल्ये, रोजगारनिर्मिती, उद्योजकता आणि सामाजिक जबाबदारी यांसाठी तरुणांना सक्षम करण्याची गरज आहे. देशाच्या विकासात युवा शक्तीचा सकारात्मक सहभाग वाढविण्याचा संदेश या दिनातून दिला जातो. जागतिक हत्ती दिन दरवर्षी १२ ऑगस्ट रोजी साजरा केला जातो. हत्तींचे संरक्षण, त्यांच्या नैसर्गिक अधिवासाचे संवर्धन, शिकारी व बेकायदा हस्तिदंत व्यापाराला आळा घालणे तसेच मानव-हत्ती संघर्ष कमी करण्याबाबत जनजागृती करणे हा या दिवसाचा प्रमुख उद्देश आहे. भारतातही हत्ती संवर्धनासाठी विविध उपक्रम राबविले जातात. हत्ती हे केवळ वन्यजीव नसून जंगलातील जैवविविधतेचे संतुलन राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे जंगलांचे संरक्षण, हत्तींचे अधिवास आणि त्यांच्या पारंपरिक मार्गांचे जतन करणे अत्यावश्यक आहे. १२ ऑगस्ट २०२६ रोजी वर्षातील एक महत्त्वाची खगोलीय घटना असलेले संपूर्ण सूर्यग्रहण होत आहे. चंद्र सूर्य आणि पृथ्वीच्या मध्ये आल्याने काही भागांत सूर्य पूर्णपणे झाकला जातो आणि काही काळ दिवसाच्या प्रकाशात अंधाराचे वातावरण निर्माण होते. नासाच्या माहितीनुसार या सूर्यग्रहणाचा संपूर्णतेचा पट्टा ग्रीनलँड, आइसलँड, उत्तर रशिया, उत्तर स्पेन आणि पोर्तुगाल च्या ईशान्य भागातून जाणार आहे. स्पेनमध्ये सूर्यास्ताच्या आसपास ग्रहणाचा अनुभव मिळणार असून, आइसलँडमध्येही मोठ्या प्रमाणावर खगोलीय निरीक्षणासाठी तयारी करण्यात आली आहे.

# श्री संत शिरोमणी सावता महाराज पायी पालखी सोहळ्याचे प्रस्थान

**पुरंदर : (दै. संध्या)**

श्री क्षेत्र सासवड (ता.पुरंदर) येथील संत सोपान काका समाधी मंदिरातून गुरूवार (दि.१३) ऑगस्ट रोजी, सावता महाराजांचा पायी पालखी सोहळा श्री क्षेत्र सासवड येथून, श्री क्षेत्र अरण भेंडी (ता.माढा,जि. सोलापूर) येथील श्री संत शिरोमणी सावता महाराज समाधी मंदिराकडे प्रस्थान होणार आहे.

पुणे जिल्ह्यातील अनेक तालुक्यातील तसेच सातारा जिल्ह्यातील अनेक तालुक्यातील भाविक, श्री क्षेत्र सासवड ते श्री क्षेत्र अरण भेंडी असा पायी पालखी सोहळा मागील नऊ वर्षांपासून सुरु करण्यात आला आहे. या वर्षी ही हा सोहळा गुरूवार दि.१३ ऑगस्ट रोजी व्यसनमुक्ती केंद्राचे तरुणांचे मित्र, ह.भ.प. बंडा तात्या कराडकर यांच्या आशीर्वादाने सासवड येथील संत सोपानदेव महाराज मंदिरातून सकाळी प्रस्थान ठेवत असल्याची माहिती, पायी पालखी सोहळ्याचे अध्यक्ष ह.भ.प. दिलीप महाराज झगडे यांनी दिली.

यावेळी, अरविंद म्हेत्रे, सुधाकर गिरमे, चंद्रकांत गिरमे, महावीर भुजबळ, रामभाऊ इनामके, आबा भोंगळे, राजाराम अडसूळ, वामण भोंगळे, अशोक टिळेकर, राजेंद्र लांडगे, ह.भ.प. गणेश महाराज राऊत, बाळासाहेब राऊत, बाळासाहेब शेवते, रविंद्र क्षिरसागर, तुकाराम गिरमे बाळासाहेब बोरावके, सचिन वढणे, संदीप हिंगणे, सुनिल वढणे, नामदेव बोरावके आदी उपस्थित होते.

गुरूवारी सकाळी संत सोपानदेव महाराज मंदिरात पादुकांची भेट होऊन सासवडकरांच्या वतीने महाप्रसादाचा कार्यक्रम होऊन, नगर प्रदक्षिणेने पायी पालखी सोहळा श्री क्षेत्र अरणकडे प्रस्थान ठेवणार आहे. दुपारचा विसावा बोरावकेमळा ग्रामस्थ, सिताराम कादबाने यमाई शिवरी. रात्रीचा मुक्काम बेलसर येथे होणार आहे.

शुक्रवार १४ दुपारचा विसावा आंबी पाटी येथे होणार असून, रात्रीचा मुक्काम मयुरेश्वर मंगल कार्यालय मोरगाव येथे होणार आहे.

शनिवार दुपारचा विसावा लोणकर वस्ती, रात्रीचा मुक्काम श्री संत सावता महाराज मंदिर कऱ्हा वाघज येथे होईल. रविवार दुपारचा विसावा नानासाहेब झांबरे प्राथमिक शाळा लिमिटेड येथे होईल, रात्रीचा मुक्काम छत्रपती मंगल कार्यालय भवानीनगर येथे होईल. सोमवार दुपारचा विसावा शिंदेवस्ती येथे होणार असून, रात्रीचा मुक्काम मुक्ताबाई मंदिर शेळगाव येथे होईल.

मंगळवार दुपारचा विसावा गोतंडी तर रात्रीचा मुक्काम श्री संत सावता महाराज निमगाव केतकी येथे होईल. बुधवार मुक्काम अर्थव लॉन्स सरर्डेवाडी येथे होणार असून, गुरूवार दुपारचा विसावा शिराळा येथे व रात्रीचा मुक्काम कुटे निवास टेंभुर्णी येथे होईल. शुक्रवार दि.२१ ऑगस्ट रात्रीचा मुक्काम श्री क्षेत्र अरण्य भेंडी येथे होणार आहे. शनिवार दि.२२ ऑगस्ट रोजी पहाटे काकड आरती; यानंतर श्री च्या पादुकांची विधी पूर्वक पूजा, तसेच समाधी मंदिरातील अभिषेक, पुजाविधी संपन्न होऊन, यानंतर, विविध फुलांनी सजवलेल्या रथा मधून पालखी व पादुका घेऊन श्री क्षेत्र अरण गावची ग्राम प्रदक्षिणा, वारकरी वैष्णवांबरोबर पूर्ण करण्यात येणार असून, यानंतर सकाळी ९ ते ११ दरम्यान, काल्याचे कीर्तनाची सेवा सोहळा प्रमुख ह.भ.प. दिलीप महाराज झगडे यांची होणार आहे. यानंतर समाज आरती होऊन, महाप्रसादाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. अशी माहिती पालखी सोहळा सचिव महावीर भुजबळ यांनी दिली.



## कदमवाकवस्तीमध्ये मोफत फिजिओथेरपी सेंटर ठरतेय नागरिकांसाठी आधारवड

**लोणी काळभोर : (दै. संध्या)**

ग्रामस्थांच्या आरोग्याची काळजी घेत ग्रामपंचायत कदमवाकवस्ती यांच्या सौजन्याने तसेच उदय काळभोर यांच्या विशेष प्रयत्नातून सुरू करण्यात आलेल्या मोफत फिजिओथेरपी व फूट पल्स सेंटरला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत जवळपास १५० नागरिकांनी या मोफत आरोग्यसेवेचा लाभ घेतला असून, विशेषतः ज्येष्ठ नागरिकांसाठी हे केंद्र मोठा आधार ठरत आहे.गुडघेदुखी, कंबरदुखी, सांधेदुखी, पायांमध्ये होणारा त्रास, शरीराच्या हालचालींमध्ये अडथळा तसेच वयोमानानुसार निर्माण होणाऱ्या विविध शारीरिक समस्यांवर आवश्यक थेरपीची सुविधा या केंद्रामध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे ही सेवा नागरिकांसाठी पूर्णपणे मोफत असल्याने आर्थिकदृष्ट्या सर्वसामान्य नागरिकांनाही त्याचा सहज लाभ घेता येत आहे. वयोमानानुसार अनेक ज्येष्ठ नागरिकांना गुडघेदुखी, कंबरदुखी आणि पायांच्या विविध समस्यांचा सामना करावा लागतो. अशा नागरिकांना नियमित फिजिओथेरपी घेण्यासाठी शहरातील केंद्रांमध्ये जावे लागत होते. त्यासाठी होणारा प्रवास तसेच उपचाराचा खर्च यामुळे अनेक नागरिकांना अडचणी येत होत्या.मात्र, गावातच मोफत फिजिओथेरपी व फूट पल्स सेंटर उपलब्ध झाल्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय दूर झाली आहे. नियमित थेरपीमुळे अनेक नागरिकांना शारीरिक हालचालींमध्ये सुलभता मिळत असून, दैनंदिन जीवनातील त्रास कमी होण्यास मदत होत असल्याचे नागरिकांकडून सांगण्यात येत आहे.



### थेरपी घेण्याची संधी

गावाच्या विकासामध्ये केवळ रस्ते, पाणी, वीज आणि इतर भौतिक सुविधा महत्त्वाच्या नसून नागरिकांचे आरोग्यदेखील तितकेच महत्त्वाचे आहे, या भूमिकेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. नागरिकांच्या आरोग्याची गरज ओळखून गावातच मोफत थेरपीची सुविधा उपलब्ध करून देणे हा निश्चितच कौतुकास्पद उपक्रम ठरत आहे.या उपक्रमामुळे आर्थिक परिस्थितीमुळे उपचार घेण्यास अडचण येणाऱ्या नागरिकांनाही आवश्यक थेरपी घेण्याची संधी मिळत आहे. त्यामुळे ग्रामस्थांकडून या उपक्रमाचे विशेष कौतुक होत आहे.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत सदस्या राजश्री काळभोर, बिना काळभोर आणि मंदाकिनी नामुगडे यांचे मोलाचे योगदान लाभले आहे. नागरिकांना या सुविधेची माहिती मिळावी, जास्तीत जास्त गरजू नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा तसेच केंद्राची सेवा प्रभावीपणे सुरू राहावी यासाठी त्यांनी सक्रिय सहभाग घेतला.ग्रामपंचायत आणि स्थानिक पातळीवरील पदाधिकारी यांच्या समन्वयातून नागरिकांच्या आरोग्यासाठी राबविण्यात येणारा हा उपक्रम कदमवाकवस्तीच्या सामाजिक आणि आरोग्यविषयक विकासासाठी एक सकारात्मक पाऊल मानले जात आहे.आजपर्यंत जवळपास १५० नागरिकांनी फिजिओथेरपी व फूट पल्स थेरपीचा लाभ घेतला आहे. नागरिकांचा वाढता प्रतिसाद पाहता भविष्यातही अधिकाधिक गरजू नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. गावातील नागरिकांना त्यांच्या आरोग्याच्या समस्यांसाठी आवश्यक सुविधा गावातच, तीही पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्याचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे.

कदमवाकवस्ती ग्रामपंचायतीच्या सौजन्याने आणि उदय काळभोर यांच्या विशेष प्रयत्नातून सुरू झालेल्या या उपक्रमामुळे “निरोगी ग्रामस्थ, सक्षम गाव” या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीची जोड मिळत असून, नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणारा हा उपक्रम परिसरासाठी आदर्श ठरत आहे.

नागरिकांसाठी ही विशेष मोफत फिजिओथेरपी व फूट पल्स सेवा दि. १० ऑगस्ट २०२६ ते दि. २१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत उपलब्ध राहणार आहे. त्यामुळे गावातील तसेच परिसरातील गरजू नागरिकांनी या कालावधीत या मोफत आरोग्य सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन उदय काळभोर यांनी केले आहे .

## महाराष्ट्रातील सहकार चळवळ आणि राजकारणाचे अतूट नाते

**चाकण (दै. संध्या)**

चाकण शिक्षण मंडळाच्या कला व वाणिज्य महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने राजगुरुनगर सहकारी बँकेचे उपाध्यक्ष रामदास धनवटे यांचे महाराष्ट्रातील सहकारी चळवळ व राजकारण या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

यावेळी धनवटे यांनी आपल्या अनुभवातून आणि अभ्यासातून महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा इतिहास, तिचे सामाजिक व आर्थिक महत्त्व तसेच राजकारणाशी असलेले परस्पर संबंध विद्यार्थ्यांसमोर अत्यंत प्रभावीपणे मांडले. राजकारणातून सहकार आणि सहकारातून राजकारण या परस्परसंबंधाचे विविध पैलू त्यांनी सोप्या व अभ्यासपूर्ण पद्धतीने स्पष्ट केले. महाराष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक विकासात सहकारी क्षेत्राने दिलेले योगदान सांगताना त्यांनी सहकारी चळवळीसमोरील सध्याची विविध आव्हाने आणि भविष्यातील संधी यावरही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

विखे पाटील, अमोल दूध उत्पादक संघ तसेच उद्योजक डी. एस. कुलकर्णी यांच्या कार्याची उदाहरणे देत त्यांनी सहकार क्षेत्रातील नेतृत्व, संघटनशक्ती आणि उद्योजकतेचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश लाटणे होते. यावेळी डॉ. हेमकांत गावडे, प्रा. अभिजीत बेंडाले यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

## स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेचा वर्धापन दिन साजरा

**चाकण(दै. संध्या)**

चाकण येथे स्व. गुलाबराव गोरे शिक्षण संस्थेचा वर्धापन दिन व कै.गुलाबशेठ सोपाना गोरे यांचा स्मृती दिन साजरा करण्यात आला.

ज्ञानवर्धिनी विद्यालय, भामा इंग्लिश मिडीयम स्कुल आणि स्व. आमदार सुरेशभाऊ गोरे माध्यमिक विद्यालय व ज्युनियर कॉलेज चाकण येथे संस्थेचे अध्यक्ष विकास गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा स्मृती दिन संपन्न झाला. स्व.गुलाबराव गोरे यांचा पंचविसावा स्मृती दिन व संस्था वर्धापन दिन प्रतिमा पुजन पत्रकार अविनाश दुधवडे व नगराध्यक्षा मनिषा गोरे यांच्या हस्ते झाले. यावेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितीन गोरे, अध्यक्ष विकास गोरे, उपाध्यक्ष राजेंद्र गोरे, संचालक अंकुश पवार, विष्णू गोरे, ओंकार गोरे, प्राचार्या प्रमिला गोरे, प्राचार्य सचिन आभाळे, प्रिन्सिपल माधुरी गोरे, पर्यवेक्षक सविता कुमकर, ज्योती अनाप, सुवर्णा चौधरी, प्रेरणा काळे, दत्तात्रय लिंभोरे, गणेश काळे, लिना चौधरी, नितीन शिंदे आदी उपस्थित होते. यावेळी मुलांनी संस्थेच्या वाटचालीची पंचवीस वर्ष यावर नाटिका सादर केली. वर्धापनदिन व स्मृती दिनानिमित्त निबंध स्पर्धा, सुंदर अक्षर स्पर्धा, चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या. गुणवंत मुलांना गौरविण्यात आले. मुलांसाठी आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी यावेळी कै. गुलाबशेठ गोरे व स्व.आ. सुरेशभाऊ गोरे यांच्या कार्याचा गौरव केला.

# आदर्श शेवराईंचे कार्य पुढील पिढीसाठी प्रेरणादायी

**दौंड (दै. संध्या)**

आदिवासी समाजासाठी आयुष्यभर संघर्ष करणाऱ्या आणि आपल्या कर्तृत्वातून अनेकांना प्रेरणा देणाऱ्या आदर्श माता कै. शेवराबाई ज्ञानदेव भोसले यांच्या निधनाने आदिवासी समाजाचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांनी केलेला त्याग, संघर्ष आणि दिलेली प्रेरणा पुढील पिढ्यांसाठी कायम मार्गदर्शक ठरेल, असे प्रतिपादन आदर्श गुरु मा. व्ही. व्ही. लक्ष्मीनारायण यांनी केले.

उरुळीकांचन येथे समाजसेवक नामदेव भोसले यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांनी कै. शेवराबाई भोसले व कै. ज्ञानदेव भोसले यांच्या प्रतिमेस पुष्पगुच्छ अर्पण करून अभिवादन केले. यावेळी त्यांनी भोसले कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी होत सांत्वन केले. या प्रसंगी ते बोलत होते.

लक्ष्मीनारायण म्हणाले,"शेवराई मातांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपल्या कुटुंबाला घडविले आणि समाजासाठीही प्रेरणादायी कार्य केले. त्यांचे संपूर्ण आयुष्य संघर्ष, त्याग आणि माणुसकीचे प्रतीक होते. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून निघणे कठीण आहे. मात्र, त्यांनी दिलेली संस्कारांची आणि सामाजिक बांधिलकीची शिकवण पुढील पिढ्यांना नक्कीच दिशा देईल.

"नामदेव यांनी दिड लाख पिढीत लोकांना गुन्हेगारीजिवनातुन बाहेर काढले आणी पाच लाख गरीब कुटुंबाच्या घरी वृक्षारोपण केले हे काम कौतुकास्पद आहे.. असे मत व्ही.व्ही. लक्ष्मीनारायण यांनी व्यक्त केले,

समाजसेवक नामदेव भोसले यांनी गुरुजनांनी दुःखाच्या प्रसंगी घरी येऊन कुटुंबीयांना दिलेल्या आधाराबद्दल कृतज्ञता व्यक्त केली."आईच्या कार्याला आणि तिच्या त्यागाला समाजाने दिलेली आदराची पावती आमच्यासाठी मोठी शक्ती आहे," असे त्यांनी सांगितले.



यावेळी लेखक भास्कर भोसले, तुकाराम भोसले, पत्रकार सुनील भोसले, बाबा भोसले, पी.एस.आय अजिनाथ शिंदे, कदम साहेब, ए. एस.आय दाभाडे, हवालदार शरद चव्हाण, प्रगतिशील बागायतदार बाळासाहेब चौरे, पोपटराव ताम्हाणे, पत्रकार अमोल भोसले, सुरेखा भोसले, शोभा भोसले, गौरी भोसले आदी उपस्थित होते.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# सागरी मंडळाच्या महसूल वाढीसाठी आराखडा सादर करा

## मंत्री नितेश राणे : महाराष्ट्र सागरी मंडळाच्या अर्थसंकल्पाला मंजुरी



■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्राच्या सागरी क्षेत्रातील पायाभूत सुविधांचा विकास, जलवाहतूक व्यवस्था सक्षम करणे, जहाजबांधणी उद्योगाला चालना देणे, बंदरे व जेट्टींच्या सुविधा आधुनिक करणे तसेच किनारी पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र सागरी मंडळाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. मत्स्य व्यवसाय व बंदरे मंत्री तथा महाराष्ट्र सागरी मंडळाचे अध्यक्ष नितेश राणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत विविध विकासकामांना मंजुरी देण्यात आली. मंडळाच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकासही संचालक मंडळाने मान्यता दिली.

मंडळाच्या मालमत्ता आणि उपलब्ध साधनसंपत्तीचा प्रभावी वापर करून महसूलवाढीचे नवीन स्रोत निर्माण करण्यावर बैठकीत भर देण्यात आला. विविध ठिकाणी उपलब्ध असलेल्या जागांचा नियोजनबद्ध वापर, भाडेतत्त्वावरील सुविधा आणि इतर महसूलवर्धक उपक्रमांमधून मंडळाची आर्थिक क्षमता मजबूत करावी्यात. सागरी मंडळाला आर्थिक सक्षम करण्यासाठी सर्व यंत्रणांनी प्रयत्न करावेत. महसूल वाढीसाठी नवीन योजनांचा नियोजनबद्ध आराखडा तयार करण्याचे निर्देश मंत्री श्री. राणे यांनी दिले.

मुंबई महानगर प्रदेशातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी मुंबई वॉटर मेट्रो जलवाहतूक प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यावर बैठकीत विशेष भर देण्यात आला. जलमार्गाचा अधिकाधिक वापर करून मुंबई आणि एमएमआरमधील वाहतुकीला पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे. निविदा प्रक्रिया नियमबद्ध, पारदर्शक आणि स्पर्धात्मक पद्धतीने राबविण्याच्या सूचना मंत्री श्री. राणे यांनी केल्या.

रायगड जिल्ह्यातील दिघी येथे ग्रीनफिल्ड शिपबिल्डिंग क्लस्टर प्रकल्प उभारण्यास मान्यता देण्यात आली. २० ऑगस्टपर्यंत निविदा सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. जहाजबांधणी क्षेत्रातील गुंतवणुकीला चालना देणे, उद्योगांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे आणि मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती करणे या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे.

मुंबई येथील रेडिओ क्लबच्या कामासाठी कार्यारंभ आदेश देण्यास मान्यता देण्यात आली. संबंधित कामे नियोजित वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. मुंबईतील किनारी परिसराच्या विकासामध्ये अशा महत्त्वाच्या ठिकाणांच्या पायाभूत सुविधांचे संवर्धन करण्यावर भर देण्यात येणार आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील सतकोंडी येथे गोवा शिपयार्ड प्रकल्पासाठी आवश्यक जोडरस्ता उपलब्ध करून देणे तसेच आवश्यक भूसंपादन करण्यास मान्यता देण्यात आली. प्रकल्पाच्या दळणवळण सुविधांना गती देण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा असून, आवश्यक प्रशासकीय कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना मंत्री राणे यांनी दिल्या. रायगड जिल्ह्यातील मांडवा पॅसेंजर जेट्टीच्या दुरुस्ती व मजबुतीकरणाच्या कामास मंजुरी देण्यात आली. प्रवाशांची सुरक्षितता आणि वाढती प्रवासी वाहतूक लक्षात घेऊन जेट्टीची कामे व्यवस्थित, दर्जेदार आणि वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. मांडवा परिसरातील जलवाहतूक आणि पर्यटनाच्या दृष्टीने या सुविधेचे महत्त्व लक्षात घेऊन कामाच्या गुणवत्तेवर विशेष लक्ष देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. मुंबईतील बांद्रा बँडस्टॅन्डच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामास मंजुरी देण्यात आली. याठिकाणी नागरिक व पर्यटकांसाठी उद्यान, बेंचेस, ॲम्पिथिएटर आणि आवश्यक सार्वजनिक सुविधा विकसित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या सुविधा आऊटसोर्सिंगच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यासही मान्यता देण्यात आली. किनारी पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या बांद्रा बँडस्टॅन्डचा परिसर अधिक सुशोभित, सुरक्षित आणि नागरिकांसाठी सुविधायुक्त करण्याच्या दृष्टीने या कामांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

### सागरी मंडळाच्या जमिनीवर स्टॉल उभारणीला मान्यता

महाराष्ट्र सागरी मंडळाच्या मालकीच्या जमिनींचा प्रभावी वापर करून स्टॉल भाडेतत्त्वावर देण्यास तसेच स्टॉल उभारणीस मान्यता देण्यात आली. स्थानिक व्यावसायिकांना संधी उपलब्ध करून देतानाच मंडळाच्या महसुलात वाढ करण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वपूर्ण आहे. स्टॉल उभारणी आणि भाडेपट्टा प्रक्रियेत पारदर्शकता व नियमांचे पालन करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

### विविध प्रकल्पांच्या कामांना गती देण्याचे निर्देश

महाराष्ट्र सागरी मंडळाच्या विविध प्रलंबित व प्रस्तावित कामांचा यावेळी आढावा घेण्यात आला. कामांना अनावश्यक विलंब होऊ नये, मंजूर प्रकल्पांची निविदा व प्रशासकीय प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी आणि प्रत्यक्ष कामे दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावीत, अशा सूचना मंत्री नितेश राणे यांनी दिल्या. महाराष्ट्राची विस्तीर्ण किनारपट्टी आणि सागरी साधनसंपत्ती राज्याच्या आर्थिक विकासाचे महत्त्वाचे माध्यम बनविण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने विविध प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. जलवाहतूक, जहाजबांधणी, बंदर विकास आणि किनारी पर्यटनाला एकत्रित चालना देणाऱ्या या निर्णयांमुळे महाराष्ट्राच्या सागरी अर्थव्यवस्थेला नवी दिशा आणि गती मिळणार असल्याचे मंत्री श्री. राणे यांनी सांगितले. बैठकीस परिवहन व बंदरे विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पी, वित्त विभागाचे उपसचिव सुनील शिंदे, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# रायगड जिल्ह्यातील ३९% शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण

## रायगड जिल्ह्यातील ७,३६७ शेतकरी खात्यांची पहिली यादी प्रसिद्ध

**महाराष्ट्र शासनाने राज्यातील शेतकरी बांधवांना कर्जाच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी आणि त्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६'ची अत्यंत प्रभावीपणे व पारदर्शक पद्धतीने अंमलबजावणी सुरू केली आहे. रायगड जिल्ह्यात या योजनेला उत्तम प्रतिसाद मिळत असून बहुतांश शेतकरी लाभार्थ्यांची प्रक्रिया गतीने पूर्ण केली जात आहे.**

योजनेतील प्रमुख निकष व स्वरूप..

- कर्जमुक्ती योजनाः दि. ०१/०४/२०१९ ते दि. ३१/०३/२०२५ दरम्यान वाटप केलेले अल्पमुदत पीककर्ज/पुर्नगठीत मध्यम मुदत कर्जातील दि. ३०/०९/२०२५ रोजी थकीत व दि. ३१/०३/२०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या हप्त्यांवर मुद्दल व व्याजासह कमाल रु. २.०० लाखांपर्यंत कर्जमाफी.
- एकवेळ समझोता योजना (OTS): थकीत रक्कम २ लाखांपेक्षा जास्त असल्यास, २ लाखांवरील उर्वरित रकमेची परतफेड केल्यावर शेतकऱ्याला रु. २.०० लाख योजनेचा लाभ मिळेल.
- प्रोत्साहनपर लाभः सन २०२२-२३ ते २०२४-२५ या काळात नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना किमान रु. ५,००० ते कमाल रु. ५०,००० पर्यंत प्रोत्साहनपर लाभ दिला जात आहे.

रायगड जिल्ह्यातील अंमलबजावणीची अद्ययावत आकडेवारी...

- पोर्टलवरील एकूण नोंदणी: रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची ८९१४ व राष्ट्रीयकृत बँकांची ३७६८ मिळून एकूण १२६८२ शेतकरी खाती शासनाच्या पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहेत.
- पहिली पात्र यादीः पहिल्या टप्प्यात प्राप्त ७३६७ खात्यांपैकी (DCCB: २२७७ राष्ट्रीयकृतः ५६९ ) आतापर्यंत २८४६ खात्यांचे (३९% पेक्षा जास्त) आधार प्रमाणीकरण यशस्वीरीत्या पूर्ण झाले आहे.
- शासनाकडून प्राप्त रक्कमः १८५९ शेतकऱ्यांसाठी रु. १०,९५,४३,००८/- ची रक्कम प्राप्त झाली असून रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यामध्ये रक्कम जमा करुन त्यांना बेबाकी प्रमाणपत्र दिले असून त्यांना नव्याने पिक कर्ज उपलब्ध करुन देण्यात आले आहे.
- इतर तपशीलः ॲग्रीस्टॅक क्रमांक नसलेले ४३८६, मयत खातेदार ५३७, आणि दुसऱ्या जिल्ह्यातील खातेदार १४४ आहेत.

प्रशासकीय नियंत्रण व पारदर्शक तक्रार निवारण..

- नियंत्रण समित्या : योजनेच्या योग्य समन्वयासाठी राज्य, विभाग व जिल्हा स्तरावर समित्या कार्यरत आहेत. रायगड जिल्ह्यात जिल्हा उपनिबंधक, जिल्हा विशेष लेखापरीक्षक, बँक व्यवस्थापक व CEO यांच्या नियंत्रणाखाली काम सुरू आहे.
- जिल्हास्तरीय तक्रार निवारण समिती (DLC) : मा. जिल्हाधिकारी, रायगड यांच्या अध्यक्षतेखालील समितीने प्राप्त १० तक्रारींपैकी ५ तक्रारींचे यशस्वी निवारण केले आहे.
- तालुकास्तरीय समिती (TLC): तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या माध्यमातून आधार प्रमाणीकरणातील अडचणी सोडवल्या जात आहेत.

### शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे आवाहन

योजनेच्या जलद लाभासाठी पात्र शेतकऱ्यांनी आपले नाव संबंधित बँक शाखा, सेवा संस्था किंवा ग्रामपंचायत कार्यालयातील यादीत तपासून घ्यावे. ज्यांनी अद्याप नोंदणी केलेली नाही, त्यांनी तातडीने जवळच्या 'आपले सरकार सेवा केंद्र' किंवा 'सीएससी (CSC)' केंद्रावर जाऊन ॲग्रीस्टॅक / फार्मर आयडी नोंदणी व आधार प्रमाणीकरण पूर्ण करून घ्यावे, जेणेकरून अनुदानाची रक्कम थेट खात्यात वर्ग करणे सुलभ होईल, असे आवाहन जिल्हाधिकारी मा.श्री. किशन जावळे, जिल्हा उपनिबंधक तनवीर पाटील, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती वंदना शिंदे, जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक विजय कुलकर्णी यांनी केले आहे.

मनोज सुमन शिवाजी सानप
जिल्हा माहिती अधिकारी
रायगड-अलिबाग

# शालेय शिक्षणमंत्र्यांच्या पुढाकाराने शाळांमधील शिक्षकेतर पदभरतीचा मार्ग सुकर

■ मुंबई (दै. संध्या)



शिक्षणमंत्र्यांचे विशेष प्रयत्न आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे शालेय शिक्षण विभागातील हजारो रिक्त जागांच्या प्रतीक्षेत असलेल्या उमेदवारांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची प्रलंबित पदभरती प्रक्रिया अखेर मार्गी लागली असून, शासनाने या पदभरतीस अधिकृत मान्यता दिली आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून रिक्त पदांमुळे शाळांच्या प्रशासकीय कामांवर होणारा ताण लक्षात घेता, या निर्णयामुळे शिक्षक आणि विद्यार्थ्यांवरील कामाचा भार हलका होणार आहे. या महत्त्वपूर्ण निर्णयामागे शालेय शिक्षण मंत्री श्री. दादाजी भुसे यांचे विशेष प्रयत्न आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा कारणीभूत ठरला आहे. शिक्षण विभागातील रिक्त पदे तातडीने भरली जावीत, यासाठी त्यांनी प्रशासकीय स्तरावर वारंवार बैठका घेत या प्रक्रियेतील अडथळे दूर करण्यावर भर दिला होता. या निर्णयाबाबत शालेय शिक्षण मंत्री श्री. दादाजी भुसे यांनी सांगितले की, "शिक्षण क्षेत्रातील गुणवत्तापूर्ण कामकाजासाठी मनुष्यबळ असणे आवश्यक आहे. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे शाळांच्या दैनंदिन प्रशासकीय कामकाजात अडचणी निर्माण होत होत्या. आता या पदभरतीला हिरवा कंदील मिळाल्याने शाळांना मोठा दिलासा मिळणार आहे. सुशिक्षित बेरोजगार तरुणांना यामुळे रोजगाराची नवीन संधी उपलब्ध झाली असून, ही भरती प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने पार पाडली जाईल, याची आम्ही सुनिश्चिती केली आहे." या शासन निर्णयानुसार कनिष्ठ लिपिक, पूर्णवेळ ग्रंथपाल आणि प्रयोगशाळा सहायक या संवर्गातील पदांची सरळसेवेने भरती करण्यास मान्यता देण्यात आली आहे. रिक्त पदे भरताना सर्वप्रथम शाळेतील पात्र चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिली जाईल. त्यानंतर अनुकंपा नियुक्तीच्या प्रक्रियेचा अवलंब केला जाईल. या दोन्ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही पदे शिल्लक राहिल्यास, संचमान्यतेनुसार एकूण रिक्त पदांच्या ८० टक्के पदांवर सरळसेवेने भरती केली जाईल. भरती प्रक्रियेसाठी बिंदूनामावली मागासवर्ग कक्षाकडून तपासून घेणे बंधनकारक असेल. तसेच जाहिरात स्थानिक व राज्यस्तरीय वृत्तपत्रांसह संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी लागेल आणि उमेदवारांना अर्ज करण्यासाठी किमान ३ महिन्यांचा अवधी दिला जाईल. खुला प्रवर्गासाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे आणि मागासवर्गीयांसाठी ४३ वर्षे असणार असून, निवड झालेल्या कर्मचाऱ्यांचा सुरुवातीचा ३ वर्षांचा कालावधी मानधनावरील असेल. तसेच मुलाखत प्रक्रियेचे इन-कॅमेरा चित्रीकरण करणे संस्थेसाठी बंधनकारक करण्यात आले आहे. पात्र उमेदवारांची निवड ही पदोन्नती, अनुकंपा आणि सरळसेवा या टप्प्यांतून होणार असून, यामुळे शिक्षण क्षेत्रातील प्रशासकीय यंत्रणा अधिक गतिमान होण्यास मदत होणार आहे. या सकारात्मक निर्णयाचे शिक्षण क्षेत्रातून स्वागत केले जात आहे.

# राजधानीत महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि पारंपरिक कलेचा रंगोत्सव

■ नवी दिल्ली(दै. संध्या)

निवासी आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र सदन आणि दक्षिण मध्य सांस्कृतिक केंद्र, नागपूर (संस्कृती मंत्रालय, भारत सरकार) यांच्या संयुक्त विद्यमाने नवी दिल्ली येथील नवीन महाराष्ट्र सदनात 16 व 17 ऑगस्ट रोजी महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक आणि पारंपरिक कलांचे दर्शन घडविणाऱ्या विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमांतर्गत रविवार, 16 ऑगस्ट रोजी सकाळी 11 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत रांगोळी कार्यशाळा, स्पर्धा आणि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

सुप्रसिद्ध रांगोळी कलाकार गणेश खरे यांचे विशेष मार्गदर्शन या कार्यशाळेत लाभणार आहे. संस्कार भारती, गालिचा, लँडस्केप, पोर्ट्रेट आणि पोस्टर रांगोळी अशा विविध शैलींचे प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण सहभागी कलाकारांना देण्यात येणार आहे. त्यामुळे पारंपरिक रांगोळी कलेसोबत आधुनिक कलाशैलींची ओळख करून घेण्याची संधी कलाप्रेमींना मिळणार आहे.

कार्यशाळेसोबतच आकर्षक रांगोळी स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले आहे. प्रत्येक स्पर्धकाला 3 बाय 3 फूट आकाराची स्वतंत्र जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

स्पर्धेसाठी आवश्यक रांगोळी व इतर साहित्य स्पर्धकांनी स्वतः आणणे अपेक्षित आहे.

इच्छुकांना ऑन-द-स्पॉट सहभागाची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. विविध शैलींमध्ये साकारलेल्या रांगोळ्यांचे प्रदर्शन दिवसभर नागरिकांसाठी खुले राहणार असून, महाराष्ट्राच्या या वैशिष्ट्यपूर्ण लोककलेचा अनुभव घेण्याची संधी दिल्लीकरांना मिळणार आहे.

या सांस्कृतिक उपक्रमाच्या पुढील टप्प्यात सोमवार, 17 ऑगस्ट 2026 रोजी सायंकाळी 6.30 वाजता 'चतुरंग' या विशेष सांस्कृतिक व सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणारे विविध कलाविष्कार सादर केले जाणार आहेत.




दिल्ली-एनसीआरमधील रांगोळी कलाकार, विद्यार्थी, कलाप्रेमी तसेच नागरिकांनी या अनोख्या सांस्कृतिक उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होऊन महाराष्ट्राच्या समृद्ध कलावैभवाचा अनुभव घ्यावा, असे आवाहन निवासी आयुक्त श्वेता सिंघल यांनी केले आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे

## ग्रामपंचायतीमध्ये समन्वयाची गरज

मुंबई : एमआयडीसी क्षेत्र व परिसरातील गावांसाठी स्वतंत्र घनकचरा व्यवस्थापन क्लस्टर उभारण्याची गरज आहे. यासाठी एमआयडीसी-ग्रामपंचायतींमध्ये समन्वयाची गरज असून याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पावले उचलण्याची गरज असल्याचे महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले. श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातील वाढत्या प्रदूषणाच्या अनुषंगाने महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. बैठकीस दूरदृश्य प्रणालीद्वारे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, सचिव राहुल रेखावार यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या, एमआयडीसी क्षेत्रातील गावांसाठी क्लस्टर पद्धतीने घनकचरा व्यवस्थापन केंद्र उभारल्यास ग्रामपंचायतींवरील आर्थिक भार कमी होण्याबरोबरच औद्योगिक क्षेत्रालगत निर्माण होणाऱ्या कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावणे शक्य होईल. स्वच्छ भारत अभियान किंवा केंद्र शासनाच्या अन्य योजनेंतर्गत घनकचरा व्यवस्थापनासाठी रायगड जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायतींनी प्रस्ताव सादर केल्यास त्यांना राज्यस्तरावरून मान्यता देण्याबाबत सकारात्मक विचार केला जावा. या स्थानिक स्वराज्य संस्थांबाबत संबंधित मुख्याधिकाऱ्यांकडून माहिती घेऊन प्रस्ताव इतर कोणत्याही योजनेत प्रस्तावित नाहीत, याची पडताळणी करण्यात यावी. स्वच्छ भारत अभियान किंवा नगरविकास विभागाच्या नियमित योजनांतर्गत दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या मूलभूत सुविधांव्यतिरिक्त मागील एक-दोन वर्षांत घनकचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र प्रस्ताव संबंधित नगरपरिषद व नगरपंचायतींनी प्रस्ताव सादर केल्यास, तो अन्य कोणत्याही योजनेत समाविष्ट नसल्याच्या अटीवर राज्य स्तरावर निश्चितपणे विचारात घेण्याबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळाने सकारात्मक विचार करावा, असेही मंत्री तटकरे म्हणाल्या. वाढती लोकसंख्या, औद्योगिक विस्तार आणि त्यातून निर्माण होणारा कचरा लक्षात घेता अशा सामूहिक व्यवस्थेमुळे परिसरातील प्रदूषण व अस्वच्छतेचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सोडविता येईल. एमआयडीसी आणि ग्रामपंचायतींच्या समन्वयातून या योजनेला गती देण्याची आवश्यकता असून, एमआयडीसीकडून जमा होणाऱ्या निधीतील योग्य हिस्सा घनकचरा व्यवस्थापनासाठी वापरण्याबाबतही विचार करण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रस्तावित कामे पूर्ण करा

मुंबई : राज्यात यंदाच्या पावसाळ्यात अनेक भागांत अतिवृष्टी झाल्यामुळे रस्ते, पूल तसेच शासकीय इमारतींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या भागातील नागरिकांच्या दळणवळणाला कोणत्याही प्रकारे अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी नुकसानग्रस्त रस्ते व पुलांची दुरुस्तीची कामे तातडीने हाती घेऊन ती वेगाने पूर्ण करावीत, असे निर्देश सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिले. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विविध कामांचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत मंत्री भोंसले यांनी राज्यातील पावसाळी परिस्थिती, अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान, रस्ते व पुलांची दुरुस्ती, नाशिक कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेली कामे, महामार्गालगतच्या जनसुविधा केंद्रांची कामे तसेच 'महाराष्ट्र अमृतकाल रस्ते विकास आराखड्या'च्या जिल्हानिहाय प्रगतीचा आढावा घेतला. बैठकीस सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, सचिव बांधकाम आबासाहेब नागरगोजे, सचिव रस्ते शरद राजभोज तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे सर्व मुख्य अभियंता उपस्थित होते.

## शिबिरांच्या माध्यमातून मिळणार दाखले

मुंबई : भटक्या, विमुक्त जमातींच्या प्रलंबित समस्या सोडवण्यासाठी आणि त्यांना आवश्यक ती सर्व कागदपत्रे व दाखले मिळावेत, यासाठी राज्यभरातील सुमारे 937 वस्त्यांमध्ये विशेष वस्ती शिबिरे आयोजित करण्याचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे. 28 ते 30 सप्टेंबर या कालावधीत ही शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. मंत्रालयातील त्यांच्या दालनात भटक्या, विमुक्त समाजाच्या समस्यांबाबत विशेष बैठक झाली. त्यावेळी महसूलमंत्र्यांनी हे आदेश दिले. या बैठकीला भटके विमुक्त विकास परिषदेचे अध्यक्ष उद्धव काळे यांच्यासह अन्य पदाधिकारी व विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### अनाथ गरीब मुलांना भोजन -शालेय साहित्य वाटप करून दीप अमावस्या साजरी

**जेजुरी : दैनिक संध्या**

पुरंदर तालुक्यातील राऊत वाडी (वीर )येथील अस्तित्व प्रतिष्ठानच्या वतीने अनाथ व गरीब कुटुंबातील मुलांना दीपअमावस्येनिमित्त मिष्टान्न भोजनासह शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. मनसे तालुकाप्रमुख उमेश जगताप मित्र परिवाराच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी मुंबई येथील उद्योगपती महेश पटेल, प्रथमेश पवार, राहुल दोडके, योगेश खुडे, संदीप जगताप, पंकज निकुडे, हेमंत सोनवणे, नगरसेवक अभिजित कुदळे, रमेश लेंडे, आदी उपस्थित होते. राऊतवाडी (वीर )येथे आस्तित्व गुरुकुल प्रतिष्ठान ही संस्था कार्यरत असून या ठिकाणी विधवा, परित्यक्ता,घटस्फोटिता, एकच पालक, मुलांचे पालन पोषण करू न शकणारी कुटुंबे, ऊसतोड मजूर, आत्महत्याग्रस्त शेतकरी, अनाथ, आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील विशेषतः मराठवाडा, नांदेड यवतमाळ, नगर, बीड आदी प्रांतातील सुमारे ५० मुले या आश्रम संस्थेत आहेत .कै .संतोष वाघ यांनी २००३ साली सुरू केलेल्या या संस्थेचे व्यवस्थापन श्रीमती पल्लवी वाघ, गीतांजली देगावकर या सद्या पाहतात .या मुलांना शालेय शिक्षणासह, मेणबत्ती, पणती, आकाश कंदील बनविण्याचे शिक्षण देत संस्कारक्षम बनवून समाजामध्ये चांगला सक्षम नागरिक करण्याचे ध्येय असल्याचे गीतांजली देगावकर यांनी सांगितले.

### पुणे जिल्हा बँकेच्या एलटीएसबी बाँड विक्रीचे निर्धारित वेळेपूर्वीच विक्रमी उद्दिष्ट पूर्ण

**पुणे : दैनिक संध्या**

स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून २२ जुलै रोजी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या एलटीएसबी व पीडीआय बाँड विक्रीचा शुभारंभ राज्य सहकारी बँकेचे प्रशासक श्री. विद्याधर अनास्कर यांच्या शुभहस्ते करण्यात आला होता. रिझर्व्ह बँकेने दिलेल्या परवानगीनुसार तसेच पुणे जिल्ह्यातील नागरी व ग्रामीण बिगरशेती पतसंस्थांना वैधानिक तरलता राखण्यासाठी (एसएलआर) करावयाच्या एकूण ठेवीच्या किमान २५ टक्के गुंतवणुकीपैकी ५ टक्के गुंतवणूक बँकेच्या बाँडमध्ये करण्यास राज्य शासनाने दिलेल्या परवानगीच्या पार्श्वभूमीवर या बाँडची विक्री करण्यात आली. बँकेने निर्धारित मुदतीपूर्वीच ५०० कोटी रुपयांच्या एलटीएसबी बाँड विक्रीचे उद्दिष्ट पूर्ण केले आहे. राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या इतिहासात इतक्या अल्प कालावधीत एवढे मोठे उद्दिष्ट पूर्ण करणारी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही एकमेव जिल्हा बँक असल्याचे बँकेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे यांनी सांगितले. दहा वर्षांच्या कालावधीसाठी किमान १० हजार रुपयांची गुंतवणूक, तसेच ८.५० टक्के आकर्षक व्याजदर आणि दर तीन महिन्यांनी खात्यावर जमा होणारे व्याज, यामुळे या बाँडला गुंतवणूकदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पुणे जिल्ह्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांसह विविध सहकारी संस्था, ठेवीदार, गुंतवणूकदार आणि सभासदांचा बँकेवर असलेला दृढ विश्वास यामुळेच हे उद्दिष्ट निर्धारित वेळेपूर्वी पूर्ण करता आले, असे दुर्गाडे यांनी नमूद केले. राज्याच्या उपमुख्यमंत्री मा. ना. श्रीमती सुनेत्रावहिनी पवार, कृषी मंत्री मा. ना. दत्तात्रयमामा भरणे तसेच माजी सहकार मंत्री आमदार दिलीपराव वळसे पाटील यांचे मार्गदर्शन या उपक्रमाला लाभले. बँकेचे सर्व संचालक, वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी, विविध कार्यकारी सेवा संस्थांचे पदाधिकारी व सचिव यांनी घेतलेले अथक परिश्रमही या यशामध्ये मोलाचे ठरले. मार्च २०२६ अखेर बँकेची आर्थिक स्थिती : बँकेच्या ठेवी १७,१८९ कोटी रुपये असून एकूण उलाढाल ३०,७६७ कोटी रुपये आहे. जिल्ह्यातील २९४ शाखांमार्फत बँकेने १३,५७८ कोटी रुपयांचे विविध प्रकारचे कर्ज वितरित केले आहे. बँकेला ४६१.३४ कोटी रुपयांचा ढोबळ नफा आणि ७८.७८ कोटी रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे.

### अथर्व हॉस्पिटलतर्फे स्वातंत्र्य दिनानिमित्त मूळव्याध मोफत तपासणी शिबिर

**पुणे : दैनिक संध्या**

पुणेकरांना मूळव्याधीच्या त्रासापासून मुक्त करण्याच्या उद्देशाने अथर्व हॉस्पिटलतर्फे स्वातंत्र्य दिनानिमित्त मूळव्याधीची मोफत तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. गुरुवार, दि. १४ ऑगस्ट ते २३ ऑगस्ट २०२६ या कालावधीत कॅम्प परिसरातील १९७०, गफ्फार बिग स्ट्रीट, श्री छत्रपती मार्केटजवळ, कॅम्प, पुणे येथे हे शिबिर होणार आहे. या शिबिरामध्ये नागरिकांची मूळव्याधीची मोफत तपासणी करण्यात येणार असून, पुढील शस्त्रक्रियेची आवश्यकता असलेल्या रुग्णांना उपचाराच्या खर्चात सवलत दिली जाणार आहे. याबाबतची माहिती मूळव्याध शस्त्रक्रिया तज्ज्ञ डॉ. संदीप अगरवाल यांनी दिली. डॉ. अगरवाल यांनी सांगितले की, आधुनिक तंत्रज्ञानामुळे मूळव्याधीवरील उपचार अधिक सुलभ झाले आहेत. बायोलॉजिकल इलेक्ट्रिकल इम्पेडन्स ऑटो मेझरमेंट तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उपचारपद्धती अधिक सोपी झाली असून, काही शस्त्रक्रिया टाके न घालता आणि मोठी चिरफाड न करता अल्पावधीत करता येतात. उपचारानंतर रुग्णाला दीर्घकाळ रुग्णालयात दाखल राहण्याची आवश्यकता नसून, वैद्यकीय तपासणीनंतर त्याच दिवशी घरी जाण्याची परवानगी दिली जाऊ शकते. दुर्बिणीद्वारेही तपासणी करता येत असल्याने रुग्णांना योग्य उपचारपद्धती निवडण्यास मदत होते. मूळव्याधीचा त्रास असलेल्या अधिकाधिक नागरिकांना या शिबिराचा लाभ मिळावा, या उद्देशाने मोफत तपासणीचे आयोजन करण्यात आले आहे. मात्र, तपासणीसाठी पूर्वनोंदणी करणे आवश्यक आहे. इच्छुक नागरिकांनी ८९२८०३३२३५ या क्रमांकावर संपर्क साधून नावनोंदणी करावी, असे आवाहन डॉ. संदीप अगरवाल यांनी केले आहे.

### महिला रुग्णालयात अवयवदान जनजागृती मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**बारामती : दैनिक संध्या**

"अवयवदान हेच श्रेष्ठ जीवनदान" हा संदेश प्रत्येकापर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने 'जुग जुग जिओ' अभियानांतर्गत महिला रुग्णालय, बारामती येथे अवयवदानाबाबत जनजागृती अभियान राबविण्यात आले. या जनजागृती मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या उपक्रमांतर्गत नर्सिंग कॉलेजमधील विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच रुग्णालयात येणारे रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांना अवयवदानाचे महत्त्व, त्याबाबतचे गैरसमज दूर करणे आणि मृत्यूनंतर अवयवदान करण्यासाठी प्रोत्साहित करणे याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी अनेक इच्छुक नागरिकांनी स्वेच्छेने अवयवदानासाठी संमती नोंदवून अवयवदानाची शपथ घेतली आहे. या समाजहिताच्या कार्यात सहभागी होऊन अवयवदानाचा संकल्प करणाऱ्या सर्व इच्छुक नागरिकांचा सत्कार करण्यात आला. हे अभियान महिला रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. बापू भोई, वैद्यकीय अधिकारी डॉ. मयूर बेलदार, सौ. सुरेखा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आले.

# २९वे आचार्य अत्रे मराठी साहित्य संमेलन संपन्न

## सासवडमध्ये दिमाखात आयोजन : कृषीमंत्री दत्तात्रय भरणे आणि साहित्यिक दि. बा. पाटील यांच्या हस्ते उद्घाटन





■ सासवड (दै. संध्या)

सासवडचे सुपुत्र, अष्टपैलू साहित्यिक आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त आयोजित २९ व्या 'आचार्य अत्रे मराठी साहित्य संमेलनाचे' उद्घाटन गुरुवारी (दि. १३) सासवड नगरपरिषदेच्या आचार्य अत्रे सांस्कृतिक भवनात अत्यंत उत्साही वातावरणात पार पडले. राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे आणि संमेलनाध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक दि. बा. पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून संमेलनाचा शुभारंभ करण्यात आला. आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान पुरंदर आणि महाराष्ट्र साहित्य परिषद (सासवड शाखा) यांच्या संयुक्त विद्यमाने या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

संमेलनाची सुरुवात करण्यापूर्वी आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठानमधील आणि सांस्कृतिक भवनातील आचार्य अत्रे यांच्या अर्धपुतळ्यास कृषीमंत्री दत्तात्रेय भरणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. याप्रसंगी जिल्हा बँकेचे अध्यक्ष डॉ. दिगंबर दुर्गाडे, स्वागताध्यक्ष प्रा. केशव काकडे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय कोलते, मसाप सासवड शाखेचे अध्यक्ष ॲड. दिलीप निरगुडे, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी सुरेश खोपडे, जिल्हा परिषद सदस्या रुपाली झेंडे, डॉ. प्राजक्ता दुर्गाडे, पंचायत समितीचे सभापती अमित झेंडे, सदस्या स्मिता निगडे, अर्चना कटके, प्रदीप पोमण, नंदकुमार जगताप, डॉ. विनायक खाडे, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. बंडूकाका जगताप यांनी स्वागत केले, तर विजय कोलते यांनी प्रास्ताविक केले. प्रा. केशव काकडे यांनी आपल्या स्वागताध्यक्षीय भाषणात उपस्थितांचे स्वागत केले.

संमेलनाध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक दि . बा. पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात आचार्य अत्रेंच्या स्मृतींना उजाळा देत साहित्यिकांच्या सामाजिक उत्तरदायित्वावर परखड भाष्य केले. सासवड ही संतांची आणि अत्र्यांची पावनभूमी असल्याचे सांगत, अत्र्यांच्या 'मराठा' वृत्तपत्राने व अग्रलेखांनी आपल्या बालवयात सर्वसामान्यांच्या वेदना समजून घेण्याची शिकवण दिली, अशी आठवण त्यांनी सांगितली. शेतकरी आत्महत्या, बेरोजगारी आणि व्यक्ती स्वातंत्र्यावर येणारी गदा यांसारख्या गंभीर प्रश्नांवर लेखकांनी नेहमी शोषितांच्या बाजूने उभे राहावे, असे आवाहन त्यांनी केले. राजकारणी मतांसाठी जाती-धर्माच्या भिंती उभारत असल्याबद्दल खंत व्यक्त करत साहित्य हा जगाचा तिसरा डोळा असून तो नेहमी सर्वसामान्यांच्या हितासाठी असायला हवा, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच राजकारणी आणि साहित्यिक एकाच नाण्याच्या दोन बाजू असून साहित्यिकांची ताकद मोठी असते, हे राजसत्तेने विसरू नये, असा इशारा त्यांनी दिला. उद्घाटक म्हणून बोलताना कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी अत्रेंच्या सामाजिक, शैक्षणिक व साहित्यिक बहुआयामी कार्याचे स्मरण केले. अत्र्यांचे विचार आणि कार्य केवळ विनोदापुरते मर्यादित नसून ते नव्या पिढीसाठी कायम प्रेरणादायी असल्याचे सांगत, त्यांनी दिवंगत नेते अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा दिला आणि त्यांची उणीव राज्यासाठी कधीही भरून न निघणारी असल्याचे नमूद केले.

तसेच उपस्थितांशी संवाद साधताना त्यांनी आई-वडिलांचा सन्मान, जिद्द, चिकाटी आणि महिलांचा आदर राखत जीवनमूल्यांचे जतन करण्याचा मोलाचा संदेश दिला. दुपारच्या सत्रात "साहित्यातील लोकजीवन " या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर एका परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. यात डॉ. केशव देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती, तर डॉ. अतुल चौरे आणि डॉ. अमोघसिद्ध चेडके यांनी सहभाग घेतला. शरदचंद्र पवार महाविद्यालय (जेजुरी) चे प्रा. डॉ. अरुण कोळेकर यांनी संयोजन केले तर प्राचार्य डॉ. धनाजी नागणे यांनी प्रायोजकत्व भूषवले.

संमेलनाध्यक्ष दि. बा. पाटील यांच्या प्रेरणादायी अध्यक्षीय भाषणाने व समारोपीय सत्राने या २९ व्या साहित्य संमेलनाची सांगता झाली. या संपूर्ण आयोजनात प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष जयसाहेब पुरंदरे, सचिव शांताराम पोमण, खजिनदार सत्येन नवलाखा, सहसचिव संदीप टिळेकर, गौरव कोलते; तसेच साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. राजेश दळवी, ॲड. कला फडतरे, कार्याध्यक्ष सतीश पाटील, कार्यवाह बाळासाहेब मुळीक, ॲड आण्णासाहेब खाडे, संतोष काकडे, दादा मुळीक, शहाजी पवार, अनिकेत जगताप, शांताराम कोलते, अक्षय पवार, सुनील वढणे, शाम पवार आदींनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सचिन घोलप यांनी केले.

> संमेलनाचे आकर्षण ठरलेल्या कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी रवी पाटील आणि सीमा कवी (बेळगाव) होते. यामध्ये राज्यभरातून आलेल्या नामांकित कवींनी आपल्या कविता सादर केल्या. कवी संमेलनात डॉ. संजय बोरुडे, रेखा दुसाने, अरुण कटारे, अशोक खेडेकर, सोमनाथ सुतार, बबन धुमाळ, स्वाती बंगाली, डॉ. लक्ष्मण हेंबाडे आणि प्रवीण कदम यांनी सहभाग घेतला. हेमंत ताकवले, दशरथ यादव आणि विद्या जाधव यांनी कवी संमेलनाचे संयोजन केले.

## शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये कविता पठण स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ सासवड(दै. संध्या)

मुलांचा आत्मविश्वास वाढविण्या सोबतच त्यांच्यामध्ये अभिव्यक्ती कौशल्य विकसित व्हावे, या उद्देशाने श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, सासवड येथे पूर्व-प्राथमिक विभागाची इंग्रजी कविता पठण स्पर्धा उत्साहात पार पडली. बुधवार, १२ ऑगस्ट २०२६ रोजी नर्सरी ते सिनियर के.जी.च्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. 'कविता म्हणजे वास्तवाचे देवीकरण' या संकल्पनेवर आधारित या स्पर्धेत एकूण २७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धा नर्सरी, ज्युनियर के.जी. आणि सिनियर के.जी. अशा तीन गटांत घेण्यात आली. सर्व स्पर्धकांनी अत्यंत आत्मविश्वासाने आणि उत्स्फूर्तपणे इंग्रजी कवितांचे सादरीकरण केले. नर्सरी गटात राजनंदिनी संदीप कामठे (नर्सरी-अ), सिद्धी लहू गोरे (नर्सरी-अ) आणि ओवी राहुल जगताप (नर्सरी-ब) यांनी यश मिळविले. ज्युनियर के.जी. गटात ऋत्विक विक्रम राजपूत (ज्युनियर के.जी.-अ), आरिका ऋषिकेश कामठे (ज्युनियर के.जी.-अ) आणि सई राजेंद्र देवकर (ज्युनियर के.जी.-ब) यांनी क्रमांक पटकावले. सिनियर के.जी. गटात रितीशा संदीप जगदाळे (सिनियर के.जी.-अ), आरोही गणेश कामठे (सिनियर के.जी.-क) आणि राजनंदिनी सचिन ढोणे (सिनियर के.जी.-ब) यांनी विजेतेपद मिळविले.

> कार्यक्रमास शाळेचे प्राचार्य डॉ. अभिजीत टकले, उपप्राचार्या सौ. सुषमा रासकर, ज्युनियर कॉलेज विभागप्रमुख सौ. उज्वला जगताप, पूर्व-प्राथमिक विभागप्रमुख सौ. सुनीता रवींद्र जगताप तसेच परीक्षक सौ. शिल्पा हेंद्रे आणि सौ. हिरा कटके उपस्थित होत्या. मान्यवरांनी मार्गदर्शक भाषणातून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करून विजेत्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. मनीषा ईश्वर पाटील यांनी प्रभावीपणे केले. सहशैक्षणिक उपक्रम विभागप्रमुख सौ. कल्पना जगताप यांनी कार्यक्रमाच्या नियोजनासाठी मोलाचे सहकार्य केले. शाळेचे जनसंपर्क अधिकारी श्री. अमोल सावंत यांनी विद्यार्थ्यांचे छायाचित्रण व चित्रीकरण करून कार्यक्रमाच्या आठवणी जतन केल्या. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षकवृंद आणि कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

## अनधिकृत बांधकामांवर तातडीने कारवाई करा

■ मुंबई (दै. संध्या)



### दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करा : अण्णा बनसोडे

कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (KUADA) कार्यक्षेत्रातील विनापरवाना व अनधिकृत बांधकामांवर तातडीने कायदेशीर कारवाई करावी. या कारवाईत दिरंगाई किंवा हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करावी, असे निर्देश महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी दिलेत. अनधिकृत बांधकामांबाबतची संपूर्ण वस्तुस्थिती व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल २८ ते २९ ऑगस्टपर्यंत सादर करावा, असेही त्यांनी निर्देशित केले.

विनापरवाना व अनधिकृत बांधकामांवर कायदेशीर कारवाई करण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ व दुर्लक्ष करणाऱ्या कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत अण्णा बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवनातील दालनात बैठक झाली. यावेळी कोल्हापूर जिल्हाधिकारी तसेच कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण संबंधित अधिकारी उपस्थित होते. कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रातील वळीवडे, उंचगाव, गांधीनगर, चिंचवाड व मुडशिंगी या गावांमधील विनापरवाना बांधकामांबाबत प्राप्त तक्रारींची बैठकीत सविस्तर माहिती घेण्यात आली. संबंधित बांधकामांना यापूर्वी बजावलेल्या नोटिसा, केलेले पंचनामे, दाखल केलेले गुन्हे तसेच न्यायालयीन प्रकरणांची सद्यस्थिती याबाबतचा आढावा घेण्यात आला.

अनधिकृत बांधकामांवर केवळ नोटिसा बजावून किंवा जुजबी कारवाई करून प्रकरणे प्रलंबित ठेवू नयेत. संबंधित प्रकरणांमध्ये नियमानुसार पुढील कठोर कायदेशीर कार्यवाही तातडीने करावी, असे निर्देश अण्णा बनसोडे यांनी दिले. कारवाईस विलंब करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून आवश्यक ती चौकशी करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

अनधिकृत बांधकामांबाबत आवश्यक त्या नोटिसा काढून पुढील कार्यवाही करावी. तसेच अशा इमारतींमधील घरांची खरेदी-विक्री रोखण्यासाठी संबंधित उपनिबंधकांना आवश्यक सूचना देण्यात याव्यात, असे निर्देश कोल्हापूर जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

> अनधिकृत बांधकामांवर कारवाई करताना कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता कायद्यानुसार कार्यवाही करावी. प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रातील अशा सर्व बांधकामांची तपासणी करून त्याबाबतची संपूर्ण माहिती आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल २८ ते २९ ऑगस्टपर्यंत सादर करावा, असे निर्देश विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

## ब्राइडल मेहंदी स्पर्धेच्या परीक्षकपदी कलाकाराचा सन्मान

■ जयश्री सातव यांच्या हस्ते रोहित सोनवणे यांचा सत्कार

■ एक कलाकार म्हणून अविस्मरणीय अनुभव

■ बारामती (दै. संध्या)



१३ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या ब्राइडल मेहंदी स्पर्धेसाठी परीक्षक (Judge) म्हणून उपस्थित राहण्याची संधी मला मिळाली. एका कलाकारासाठी ही गोष्ट नक्कीच खूप मोठी आणि अभिमानाची आहे.

बारामती तालुका मराठा सेवा संघ व जिजाऊ सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सुंदर कार्यक्रमात उपस्थित राहून विविध कलाकारांच्या कलाकृती जवळून पाहण्याचा आणि त्यांचे कौशल्य अनुभवण्याचा मला आनंद मिळाला.

विशेष म्हणजे बारामती नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा सौ.जयश्री भाभी सातव यांच्या हस्ते कलाशिक्षक रोहित सोनवणे यांचा सत्कार करण्यात आला. माझ्या कलेचा आणि कलाकार म्हणून केलेल्या प्रवासाचा झालेला हा सन्मान माझ्यासाठी खूपच खास आहे. तसेच स्पर्धेसाठी आलेल्या सर्व मेहंदी कलाकारांना त्यांच्या पुढील कलात्मक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्याची आणि त्यांना काही मार्गदर्शन करण्याची संधी मिळाली. त्यांच्या कलेतील मेहनत,कल्पकता आणि आत्मविश्वास पाहून खूप आनंद झाला.

आजचा हा अनुभव माझ्यासाठी केवळ एक कार्यक्रम नव्हता,तर एक कलाकार म्हणून मिळालेली नवी ओळख,नवा आत्मविश्वास आणि पुढे आणखी चांगले काम करण्याची प्रेरणा होती.

मला या कार्यक्रमासाठी परीक्षक म्हणून आमंत्रित केल्याबद्दल आयोजकांचे मनःपूर्वक आभार..! कला ही केवळ छंद नसते... ती आपली ओळख बनते..!

## स्वातंत्र्यदिनी असाक्षर मुक्त गावाची शपथ घेण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन

■ पुणे (दै. संध्या)



उल्लास नव भारत साक्षरता कार्यक्रमाच्या प्रचार- प्रसिद्धीसाठी राज्य स्तरावरुन विविध उपक्रम राबविले जात असून त्याअंतर्गत येत्या स्वातंत्र्यदिनी प्रत्येक शाळेत असाक्षर मुक्त गावाची शपथ घेण्यात यावी, असे आवाहन जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर यांनी केले आहे. माझे कुटूंब, गावाला १ मे २०२७ पर्यंत साक्षर करेल, मी माझ्या परिसरातील एकही व्यक्ती असाक्षर राहणार नाही यासाठी सतत प्रयत्न करेन. मी माझ्या कुटूंबातील सदस्य, मित्र आणि समाजातील प्रत्येक व्यक्तीला वाचन, लेखन व संख्याज्ञान शिकण्यासाठी मदत करेन. मी किमान दोन असाक्षर व्यक्ती साक्षर करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करेन. सर्व असाक्षर व्यक्ती शिक्षणाच्या प्रवाहात येण्यासाठी १०० टक्के योगदान देऊन माझा महाराष्ट्र, साक्षर महाराष्ट्र होण्यासाठी मी कटीबद्ध आहे, अशी शपथ प्रत्येक शाळेत देण्यात यावी, असे श्री. कारेकर यांनी कळविले आहे.

# गुजरात आणि महाराष्ट्रातील पूरग्रस्तांशी संबंधित १०० हून अधिक दावे निकाली

**पूरग्रस्तांसाठी कंपनीने जलद दावा-निकाली प्रक्रिया राबवली असून, ग्राहकांना विलंब न होता मदत मिळावी यासाठी समर्पित पथके अथकपणे कार्यरत आहेत.**

■ पुणे (दै. संध्या)



भारतातील नामांकित जनरल इन्शुरन्स कंपन्यांपैकी एक असलेल्या इफको-टोकिओ जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड (इफको-टोकिओ जीआयसी) ने अलीकडे आलेल्या पुरामुळे प्रभावित झालेल्या ग्राहकांना तातडीने मदत देण्यासाठी आपले प्रयत्न अधिक वेगाने सुरू केले आहेत. कंपनीने आतापर्यंत मोटर आणि नॉन-मोटर विमा पॉलिसींसह १०० हून अधिक क्लेम सेटल केले आहेत. कंपनीने पूरग्रस्त ग्राहकांसाठी तातडीची जलद दावा-निकाली प्रक्रिया राबवली आहे. या कठीण काळात इफको-टोकिओ जीआयसी पूरग्रस्त लोकांच्या पाठीशी उभी आहे. प्रभावित विमाधारकांना शक्य तितक्या लवकर आर्थिक मदत मिळावी यासाठी तिच्या समर्पित टीम सर्वेक्षण, नुकसानाचे मूल्यांकन आणि क्लेम सेटलमेंटला वेग देण्यासाठी सक्रियपणे कार्यरत आहेत. यासंदर्भात इफको-टोकिओ जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेडचे डायरेक्टर (ऑपरेशन्स) श्री. तत्सुया फुजिमोटो म्हणाले, "इफको-टोकिओ जीआयसीमध्ये आम्ही गुजरात आणि महाराष्ट्रात अलीकडे आलेल्या पुरामुळे प्रभावित झालेल्या कुटुंबांच्या आणि व्यवसायांच्या अडचणी चांगल्या प्रकारे समजून घेतो. 'गरजेच्या वेळी आपल्या ग्राहकांसाठी आणि समाजासाठी उपस्थित राहणे' हे आमचे ध्येय नेहमी लक्षात ठेवून आम्ही काम करतो. त्यामुळे, वास्तविक क्लेमचे मूल्यांकन आणि सेटलमेंट शक्य तितक्या लवकर व्हावे यासाठी आमच्या टीम आवश्यक ती कार्यवाही करत आहेत. या कठीण काळात आमच्या ग्राहकांना तातडीने मदत देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत." क्लेमसंदर्भात मदतीसाठी ग्राहकांनी त्यांच्या जवळच्या इफको-टोकिओ (IFFCO-TOKIO) कार्यालयाशी किंवा कंपनीच्या ग्राहक सहायता चॅनेल १८००-१०३-५४९९ वर संपर्क साधावा. ग्राहकांसाठी आवश्यक खबरदारी पुराच्या काळात आणि त्यानंतर लोकांनी आपल्या सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे आणि नुकसानाचा धोका कमी करण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असा सल्ला दिला जातो. त्यांनी पूरग्रस्त भागात जाणे किंवा पाण्याने भरलेल्या रस्त्यांवरून वाहन चालवणे टाळावे तसेच उघड्या विद्युत तारांपासून दूर राहावे. सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य वाटत असल्यास मुख्य वीजपुरवठा बंद करावा. शक्य असल्यास आपल्या वाहनांचे, घरांचे, व्यवसायाचे किंवा इतर विमाधारक मालमत्तेचे झालेले नुकसान, नुकसानग्रस्त वस्तूंची दुरुस्ती किंवा विल्हेवाट लावण्यापूर्वी, फोटो किंवा व्हिडिओद्वारे नोंदवावे. त्यांनी नुकसानीशी संबंधित आवश्यक कागदपत्रे, बिले आणि इतर पुरावेही जतन करून ठेवावेत आणि घटनेची माहिती त्वरित आपल्या विमा कंपनीला द्यावी.